नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

वर्ष १ लें अंक २ रा	फेब्रुवारी १९४६	वार्षिक वर्गणी रु. ५ किरकोळ अंकास ॥-

अनुक्रमणिका

		पृष्ठ
Bee यांचें छायाचित्र		
कविता—		
१ भारतीय जीवन	Bee	१
२ आठवण	Bee	२
३ दोन 'मी'	Bee	३
४ स्वैर गीत	Bee	४
५ एक दृश्य	Bee	५
६ अध्यात्म	Bee	६
७ काव्यानंद	१ मराठी—Bee	७
	२ संस्कृत—वि. के. पेशवे	७
८ Bee यांस—	पां. श्रा. गोरे	८
साहित्यिकाचा परिचय—		
१ नारायण मुरलीधर गुप्ते ऊर्फ Bee	वा. ना. देशपांडे	९
२ Bee यांच्या सहवासांत	१ रा. ह. देशपांडे	२१
	२ त्र्यं. ब. पुराणिक	२४
विविध—		
१ गुप्त सरस्वती [साहित्यिकांचीं पत्रें]	Bee यांचीं चार पत्रें	२६
२ संपादकीय		३०
३ संघवार्ता		वेष्टन ३

वाचकांस सूचना—

१ पूर्वी जाहीर झाल्याप्रमाणे हा द्वितीयांक **Bee विशेषांक'** म्हणून वाचकांना सादर करण्यात येत आहे. यापुढे दर महिन्यांत दोन अंक प्रसिद्ध करून सप्टेंबर महिन्यापर्यंत मागील सर्व अंकांची भरपाई करून देण्यांत येईल. 'युगवाणी'-चा **तिसरा अंक जून १५ तारखेपर्यंत** प्रसिद्ध होईल.

२ 'युगवाणी'-चा प्रथमांक सर्व सभासदांकडे व वर्गणीदारांकडे काळजीपूर्वक रवाना करण्यांत आला आहे. तो अंक कोणाला मिळाला नसल्यास तसें खालील पत्त्यावर कळविण्याची कृपा करावी. अंक न मिळाल्याची तक्रार, प्रथम पोस्टांत चौकशी करून, दहा दिवसांच्या आंत कार्यालयाकडे पाठवावी. मागील सर्व अंक बरोबर येईपर्यंत प्रत्येक अंकांत पुढील अंकाच्या प्रकाशनाची तारीख प्रसिद्ध करण्यांत येईल.

३ जाहिरातींसंबंधीं सर्व पत्रव्यवहार खालील पत्त्यावरच करावा.

ना. कृ. दिवाणजी
व्यवस्थापक, 'युगवाणी'
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, अमरावती.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी – ' Bee विशेषांक '—

नारायण मुरलीधर गुप्ते
ऊर्फ " Bee "

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यु ग वा णी

वर्ष १ लें | फेब्रुवारी १९४६ | अंक २ रा

संपादक— वामन नारायण देशपांडे

Bee यांच्या सहा अप्रसिद्ध कविता—

१ भारतीय जीवन

१

जीवमात्रामधे राहे एक शक्ति अपार्थिव
जड सूक्ष्मेंद्रियद्वारां हो तिचा व्यक्त संभव* १

क्रियाशक्तिस्वरूपानें अनेकविध जो घडे—
व्यवहार तयालागीं 'कर्म' ही अभिधा पडे २

व्यक्तिकर्मप्रवाहांचें वाहणें तेंच 'जीवन'
स्थळीं एकीच हो त्याचें जन्म आणि विसर्जन ३

'चैतन्य' म्हणती त्यातें सर्व विश्वास निर्मुनी
स्वभावचि असे त्याचा रहावें त्यांत व्यापुनी ४

सर्वव्यापक तत्त्वा या नावें वहुत ठेविती
'जगज्ज्योति,' 'अंतरात्मा,' 'जगज्जीवन' बोलती ५

विभूती त्यांतुनी येती–जाती आम्हांस देउन
ज्ञान तेजें समायुक्त विकासमय जीवन ६

भारताचा असे मोठा विस्तार तरि आपणा
महाराष्ट्र-प्रतीकानें† करूं येतेच अर्चना ७

प्रतिमा–पूजनें होती ईश्वराप्रति अर्पण
महाराष्ट्र–मिषानें+ हो भारताचेंच पूजन ८

विपन्नकालीं देशाच्या अग्रभागीं सदा स्थित
राहिला हा महाराष्ट्र आज राहील निश्चित ९

२

एकांतांत महत्कार्यें स्फूर्ति–पूर्तीस पावती
राष्ट्रोदय नवे होती सूज्ञ सर्वत्र बोलती १०

एकांतांत वसूं जातां अन्य संकल्प सोडुनी
विचारांचें विकारांचें काहूर उठतें मनीं ११

विवेकभ्रष्ट तत्त्वांचा वडिवार विवादती
तत्त्वें तीं असतीं कोणा-साठी हें ते न पाहती ! १२

व्यावहारिक तत्त्वें तीं सापेक्ष असतीं सदा,
भिन्नावस्थेंत कामाला तेंच तें ये न सर्वदा १३

देशकार्यीं तत्परातें निंदिती उत्तरोत्तर
कृतीच्या शून्य नावाने शब्दगुंड घरोघर ! १४

स्वदेशाच्या गौरवांत आपला होय गौरव
यातना, हाल जे त्याचे–आपला तोच रौरव ! १५

शक्तीचें वसतिस्थान अंतःकरण केवळ
पवित्र जीवनाधारें कर्में होतात सोज्ज्वळ ! १६

सुखाचीं वर्णितां स्वप्नें भ्रांत चित्तें सदोदित
सत्य सृष्टींत येतीं का ?– व्हावें कार्यास उद्यत‡ ! १७

स्वतंत्राची देशवाणी देशवैभव गर्जते
पराधीनें स्वदेशाचें रचावें स्तोत्र कोणतें ? १८

जाणत्यानें सदा व्हावें यत्न-साहस–तत्पर
सिद्धिदाता होत आला सत्यसंकल्प ईश्वर ! १९

शक्तीच्या चालका रामा ! पुरवी मनकामना
'सत्यं-शिवं–सुंदरम्' दे आनंदवनभूवना§ ! २०

Bee

---

* अस्तित्व. † प्रतिमा. + रूपाने

‡ आरंभ करणें. § महाराष्ट्र.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

२ आठवण

१

ऊन उतरतें होतें, वारा पडला होता बंदीं
दिशादिशांच्या नेत्रीं भरली होती मादक धुंदी १

नेती जिकडे पाय मागुनी शरीर तिकडे जातें
शून्यत्वाचा अभाव उघडे डोळे पाहत होते २

मंदावत पाउलें चाललीं खिन्न मनाच्या भारें
तीव्र भाव हो जसा मंदतर अवास्तविक विस्तारें ३

मूर्तिमंत रूक्षता वावरे अफाट त्या मैदानीं
उडता जीव न दिसला एकहि ध्वनि नच पडला कानीं ! ४

रिता एकटेपणा जगीं या भीषणतर भारी
साक्षात्कारीं अनुभविली मीं मारकता ती सारी ! ५

२

काळी तरुराजी क्षितिजावर दिसली त्या अवकाळीं
हरिणीच्या नेत्रांतिल जणुं का काजळरेषा काळी ! ६

उडती दुनिया दिसूं लागली रानीं गजबज झाली
स्वर्णरसाने सारवलेलीं शेतें पिवळीं पिवळीं ७

बंदीतुन वाराही सुटला मुक्त खगासम भिरभिरला
झाडें झुडुपें डोलुं लागलीं उत्सव तृणपर्णी भरला ८

वाऱ्यावरुनी अवचित आल्या गीतसुधेच्या धारा
चित्तमोर नाचला आपला उघडुनि पूर्ण पिसारा ९

स्त्री·कंठांतिल होते ध्वनि ते भाव न ये निर्धारा
शेळेलेचा चंडोल गाय की गिरिधर नागर **मीरा** ! १०

ओसरतें हो गीत चाललें अपूर्व त्यांतिल गोडी
*मिळे नृत्यगतिशीलाची त्या संगीताला जोडी ११

रूपराशि **ऊर्वशी** वाटलें स्वर्गांतिल सुकुमारा
भरूनि हातीं शुद्ध चांदणें करीत होती मारा ! १२

होतां आठव अंतःकरणीं ते गीतस्वर भरती
हृदय नाचतें नृत्यगतीच्या अविरत तालावरती १३

Bee

---

* ते गीतध्वनि नृत्यगतिशील होते.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

३ दोन ‘ मी ’

१

मज सर्वज्ञा कळे न त्याला एक शिवी मी हासडतों
‘शतपातांचों’ कलाभिज्ञ मी आग तयावर पाखडतों १

डोकें लढवुनि पैका कमवी का मज म्हणता ‘ पोटभरू ’ ?
खाल तुपाशीं आणि उपाशी काय एकटा मीच मरूं ? २

‘ माल गधोंका अक्लमंदका खुराक ’ हें आपण करितां
गाल्या मजला का देता हें सत्यव्रत मीं आचरितां ? ३

पुढे पुढे जे जाती त्यांना टांग ओढूनी पाडितसे
पुरुषार्थाची कृतार्थतेची सिद्धि याविना अन्य नसे ! ४

मात्र तुम्हांला मतें असावीं नकोत मज कांही काय ?
गाड मनीं तीं मला सांगतां घोर होतसे अन्याय ! ५

“ हिंदुस्थाना रशिया बनवा ”—महायुद्ध सांगे वर्म
‘ प्रथम भेद मग छेद भयंकर ’ हाच आमचा कुळधर्म ! ६

२

विशालतेंतिल भिन्नत्वांतिल एकसूत्रपण अव्यंग
कळोनि आहे आणायाचें वर्तनांत तें सर्वांग ७

सुधारणा पाहतां आजची आपणांस हें स्पष्ट दिसे
पाशवता परिपूर्ण आंतली उफाळूनि वर येत असे ८

अणु परिमाणू रेणु आणि तिस्रेणूवर वर्चस्व दिसे
हा बुद्धीचा विकास, पण तो मानवतेचा खास नसे ! ९

बुद्धीचा तर विकास येतो राक्षसांतही आढळुन
मनुष्यत्व राक्षसास देणें आर्यधर्म हा सनातन १०

उत्पत्ति स्थिति तसाच लय हा सृष्टीचा क्रममार्ग असे
महन्मंगला चिच्छक्तीचा हा तर परमोल्हास दिसे ११

योग बुद्धिचा मानवतेशीं ‘ बुद्धियोग ’ निस्स्वार्थपर
शिकोनि टाळूं हा आताचा क्रूर तामसी संहार १२

---

१ मोरोपंतांचें हंसकाकीय कथन. २ मूळ स्वभाव. ३ धर्म=मूळ स्वभाव.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

३

संस्कृति म्हणजे जीवनसरणी वेगवेगळ्या त्या असती
विशेषता तींतली आपली दक्षपणें या रखूं ती १३

संस्कृति परकीयाची करणें आत्मसात हें शक्य नसे
अंगलगट करूं नका तिच्याशीं त्यांत आपला घात असे १४

जीवन-संजीवनी त्याग ही राष्ट्र असो संपन्न नसो
ना तरि त्याचा विनाश मनिं हें अक्षयतेचें तत्त्व ठसो १५

देश असे माझा मी त्याचा सर्वस्वार्पण करीन मी
निर्वाणींही कधी न होइन देशाचा बेमानहरामी १६

भारतास भूषण विश्वाचें करण्याचा निर्धार धरूं
देशहितास्तव जगूं, नाहि तर प्राणांचा उत्सर्ग करूं ! १७

Bee

४ स्वैर गीत

अयि स्वैरते ! गाइ गीत तूं. मतवाली! तूं. तूं अतुला.
विषयांची निर्मात्री ती तूं. विषय कोणता देउं तुला ! १

* * * *

" स्वैर पाखरें विचरति वरती, स्वैर फिरे वनवायु वरी.
कृष्ण मेघमंडळ प्रकाशुनि मुक्त तेज संचार करी. २
स्वतंत्रतेचा अर्णव फेकी स्वतंत्र लहरींवर लहरी
जनसंमर्दी स्नात करोनी सौभाग्याचा सेस[1] भरी ३
पूर लोटला उत्साहाचा उसळत महितळ सकळ भरी
ऊठ, होय जागृत बसलासी काय उगा तूं स्वस्थ घरीं ? ४
प्रतिभेच्या आरशांत पडते निसर्गछाया[2] मनोहर
वाङ्मयतप कर प्रसन्न होइल प्रतिभादेवी निरंतर ५
भेसुरतेला सांग मराठा म्याला केव्हां काय तरी ?
वाङ्मय-गंगा खाली नेउनि सहस्रायुधें देइ करीं ६
प्रणयपंकजासवें खेळणें आता तरि तूं पुरे करी
नियमांचें परिपालन सरलें जाय कराया मुलुखगिरी ७
यशोगान-दुंदुभी नादवुनि नेई त्याला दिगंतरीं
ज्योत जागती करीं धरोनी दीपस्तंभ उभारि वरी " ८

* * * *

बाइ स्वैरते ! स्वैर धावसी धावूं मागे कोठवरी ?
दमलों ! ' लेखन-कामाठी ' मी आता सारी पुरे करीं. ९

Bee

---

१ स्वच्छंदी. २ मळवट. ३ स्वभाव.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९४६

५ एक दृश्य

विदर्भांत डोंगरांत आहे गाव नाव बुलढाणें
वनलक्ष्मीच्या शृंगाराचें एक अमोलिक लेणें ! १

गांवाच्या उत्तरेस आहे जवळचि डोंगर मोठा
द्वारपाळ हा खडा पहारा देउनि रक्षी वाटा ! २

तिकडे वस्तीपासुनि लागे उतरण कांही थोडी
चढण लागते पुढे जराशी जाया उंच पहाडीं ३

त्या उंचावर आहे मोठा एक कडा तुटलेला
दृष्टि देखणी* एकवटे ती शोभा निरखायाला ४

पायांखाली उंच कड्याच्या गोलाकार दरी ती
पश्चिमेस मुख करुनि दूरवर पसरत गेली होती ५

सायंकाळीं एके दिवशीं नित्याच्या परिपाठीं
सहज निघालों व्यवसायाच्या श्रमपरिहारासाठी ६

त्या रमणीय स्थळीं पातलों, जाउनि वरती बसलों
सृष्टीचें तें दृश्य पाहतां विसरुनि मज मी गेलों ! ७

सूर्यबिंब सारखें धावतें अस्तगिरीच्या संगा
निजैश्वर्य-रंगें अभिषेकी ज्योतिर्मय महिलिंगा+ ! ८

रविबिंबाचें रूप घेउनी वाटे की अनुरागें
नील नभाचीं, धवल घनांची रंजित केलीं अंगें ! ९

रक्तवर्ण पर्वतीं रांगें त्या वस्तुजात रंगे
शुचिर्भूतही तसाच होई मी त्यांच्या अनुषंगें १०

दृष्टिपथीं ये एकाएकीं दरीवरिल आकाशीं
ताम्रछटा-मिश्रित रंगाचा एक कृष्ण पक्षी ११

आला कोठुनि कळलें नाही निज गति कुंठित करुनी–
पक्षद्वय निज पसरुनि सुस्थिर राहे निश्चळ गगनीं ! १२

दृष्टि करुनि एकाग्र नेहटुनि÷ पाहे रविबिंबासी
व्रताचरण करितसे उग्रतर काय विहग वनवासी ? १३

चलित§ स्थिति होतां त्याची तो एक घेउनी गिरकी
तीव्र चित्कारें स्थिर होउनि बिंब पुन्हा अवलोकी. १४

नवलाचें तें दृश्य पाहतां वेध लागला चित्ता
चाहुल नसतां एकाएकीं प्राप्त होय तन्मयता ! १५

---

* पाहणारी + पृथ्वीरूपी शिवलिंग ÷ जोराने § तोल गेला असतां

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तन्मयता ती चिंत्य वस्तुच्या खोल अंतरीं शिरते
बहिरंगाच्या वरते तुसते फेरे घालित नसते ! १६

मला वाटलें, झेप घेउनी उंच नभाच्या मार्गीं
पक्षी लोपुनि खरोखरी स्थिर झालों त्याचे जागीं ! १७

पृथ्वीवर जड शरीर सोडुनि झालों गगनविहारी
त्या पक्षासम करूं लागलों त्याची अनुकृति सारी ! १८

व्हावें स्थिर मग गिरकी घ्यावी, रक्तबिंब लक्षावें,
असें चाललें किती वेळ तें नाही मजला ठावें ! १९

अज्ञातांतुनि पक्षी आला, गेला-मीहि निघालों
पद न लागतां भूमीला मी वरवर चालत आलों ! २०

शरीरांत असतीं तत्त्वें का जीं जाणिव घेवोनी—
अंतराळ-मार्गानें जातीं त्वरित इच्छिल्या स्थानीं ? २१

–विचार करितां प्रश्न सुटेना, हुरहुर चित्तीं लागे
झोपेंतहि तेजाळ दृश्य तें लागे माझ्यामागे ! २२

Bee

६ अध्यात्म

अध्यात्म शास्त्र म्हणती तरि तें कशाला ?
त्याचें प्रयोजन कळे न च जाणत्याला !
हें शास्त्र काय ? न दिसे उपयोग त्याचा–
हा तों विकल्प[१] दिसतो कवि–कल्पनेचा ! १

जें का विचार करितें जड भौतिकाचा
तें मात्र शास्त्र म्हणणें अविचार साचा !
जें दे अचेतन अणुप्रति चेतनेतें
तें नित्य तत्त्व कळणें अनिवार्य होतें ! २

तें तत्त्व निर्णय करी जड शोधनाने
संशोधिला सकलही व्यवहार त्याने
अध्यात्म मानस तथा व्यवहारसार
एकत्र यांत मजला दिसतो विचार ३

यानेच शुद्धतर हा व्यवहार केला
यानेच व्यापकपणा दिधला तुम्हांला
पूर्वेतिहास पढतां पटते मनाला
देईल वैभव पुन्हा नव[२] भारताला !

Bee

१ भ्रम २ क्रमप्राप्त

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काव्यानंदः

[कविवर्य Bee यांच्या ' काव्यानंद ' या कवितेचें संस्कृत भाषांतर पुढे दिलें आहे. हें भाषांतर यवतमाळचे रा. विष्णु कृष्ण पेशवे, एम्. ए., एल्.एल्. बी., यांनी केलेलें आहे. संस्कृत व्याकरण घेऊन नागपुर विद्यापीठाचे एम्. ए. होणारे रा. पेशवे हे आपल्या प्रांतांतील पहिलेच गृहस्थ होत. वाचकांच्या सोईसाठी मूळ मराठी कविता आरंभीं दिलेली आहे. — संपादक]

काव्यानंद (मराठी)

दैत्यांनो ! न समुद्रमंथन, वृथा येथे बळाची कथा
येथे वायुसुता ! हतप्रभ तुझी उड्डाण दर्प-प्रभा.
होतें अक्षमवेग यद्यपि जगच्चक्षो ! तुझें दर्शन
वाया केवळ वादपाटव न हें वाचस्पते ! वाग्रण. १

येथे अद्भुतरम्य नित्य पडलें स्फूर्तिप्रभेचें कडें
अम्लान प्रतिभाकळ्या उमलल्या आहेत चोंहीकडे
वोसंडे दुथडी भरूनि सरिता सत्कल्पना पावन
वृत्तांची रसलीन चंचळ खगश्रेणी करी क्रीडन. २

सारींही जड इंद्रियें न शकती येथे प्रवेशावया
बुद्धिग्राह्य न वाव त्यास, न कळे ठाव प्रमाणत्रया.
वृत्त्यंतर्गत टाकणें कठिणता, तद्रूपता पावणें
काव्यानंदरसप्रसंग मग हा निःसंग संभोगणें. ३

काव्यानंदः (संस्कृत)

दैत्यानापि समुद्रमंथनमिदं सामर्थ्यगर्वैरलम्
आकाशोद्गमनप्रथा यदि मरुत्सूनो वृथा तेऽधुना
यद्यप्यक्षमवेगमत्र न जगच्चक्षुस्तदा दर्शनम्
धिग् वागीश भवद्विवादपटुता वादस्य नेदं रणम् १

अत्रैतत् सततं विचित्ररुचिरं स्फूर्तिप्रभामण्डलम्
प्रत्यग्राः कलिका विकासमभजन् सर्वत्र याः प्रातिभाः
अत्रैषोभयकूलभाक् शुचितमा सत्कल्पनावाहिनी
या क्रीडद्रसलीनवृत्तिविहगैः पूर्णा सदा चञ्चलैः २

शक्यं नैव प्रवेष्टुमत्र सकलैर्बाह्यैर्जडैरिन्द्रियैः
बुद्धेरत्र गतिर्न साध्यमथवा यत्स्यात् प्रमाणैस्त्रिभिः
वृत्तिस्थामपहाय तत्कठिनतां तद्रूपतालंबनम्
काव्यनंदरसस्य तस्य मनसा निःसंग निर्वेशनम् ३

विष्णु केशव पेशवे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

Bee यांस—

भावांचे झरती विशुद्ध रस जे काव्यीं तुझ्या साजिरे
भृंगा ! वाहति काय ते झुळझुळा अच्छोदकाचे झरे ?
किंवा चेतविती उदात्त रुचिरा चित्तास ज्या कल्पना
तेजें उज्ज्वल तारका चमकती घायास का चेतना ? १

वाणीं गोड, पदोपदीं मधुरता, लावण्य चेतोहर !
मुद्रा हास्यमुखी सुरंग गहिरी वाग्योजना सुंदर
तारुण्यास कधी न ज्या क्षय, तशी अम्लान ती चारुता
तत्त्वालंकृत दर्शनीं न रिझवी कोणा तुझी वाक्सुता ? २

पोथी दिव्य, जिवा तुझीच **कमळा** “हातीं सतीच्या दिवा”
चाफ्याची सुटतां हवा चहुकडे उल्हास नाचे नवा !
लावी वेड कुणा न मंजुळ तसें तें **वेडगाणें** नवे !
कन्या दीन बघून कोण नयनीं गाळील ना आसवें ? ३

केलें घोषित रे ! तुवाच टिपरी पाडून **डंक्यावर**
“आम्हा भूषण बंडखोर पहिला तो संत ज्ञानेश्वर
देऊं साथ तया अखंड उठवूं चोहीकडे दंगल
ध्वंसूं कृत्रिम भेदभाव सगळा साधूं जगीं मंगल” ४

बोला अद्‌भुतरम्य ऐकुनि तुझ्या पूर्वस्मृती संचरे !
वेगें रक्त नसानसांत उसळे ! चैतन्य रोमीं स्फुरे !
नंगा नाच करून जी भिवविते रूढी महाराक्षसी
ठेचायास पदीं कुणा न चढते ईर्ष्या गड्या ! मानसीं ? ५

“देऊं तोंड नवीन काळ जर हा होऊन आम्ही नवे”
काव्यांतून अमोल बोल निघती जे आज राष्ट्रा हवे
आशावाद तुझा जिवंत मरणा देईल संजविन
कोणा प्यार न तें निरामय तुझें सत्काव्य तेजोधन ? ६

काव्याच्या दिवट्या करीं उजळुनी नाचोत वेडे किती
तेजस्वी प्रतिभा तुझीच सुकवे ! न्यारी तिची रे ! द्युती
मानाचा मुजरा तुझ्याच चरणीं वाहीन वागीश्वरा !
जेथे पाय पडेल होइन तुझ्या मी पायरीचा चिरा ! ७

पांडुरंग श्रावण गोरे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नारायण मुरलीधर गुप्ते उर्फ Bee

वामन नारायण देशपांडे

१ Bee कडे प्रथम लक्ष्य कसें गेलें ?

कविवर्य Bee यांच्या कवितेकडे माझें लक्ष्य प्रथम कसें वेधलें गेलें, हा प्रकार सांगण्याजोगा आहेः मी यवतमाळ येथे हायस्कुलांत शिकत असतां जुन्या-नव्या मासिकांतील कविता वाचण्याचा मला फार नाद होता. एकदा 'मनोरंजन' चा एक जुना अंक माझ्या अवलोकनांत आला. या अंकांत 'कमळा' नावाची एक बरीच मोठी कविता आलेली असून ती फार सुंदर छापली होती. कवितेच्या नायिकेचें एक फक्कड चित्रहि देण्यांत आलें होतें. कवितेवर 'श्रीयुत Bee' असें कविनाम झळकत होतें ! ही कविता वाचून मी इतका बेहद्द खूष झालों की, तिचीं कितीहि पारायणें केलीं, तरी मनाची तृप्ती होईना ! या कवितेविषयींची माझी आवड अजूनहि पूर्वीइतकीच कायम आहे. मला वाटतें, 'कमळा' कवितेच्या सरसतेची साक्ष देण्यास ही एकच गोष्ट पुरेशी आहे.

ही कविता मीं प्रथम जेव्हा वाचली, तेव्हा Bee हे कोण गृहस्थ आहेत, याची मला कांहीच माहिती नव्हती. 'Bee' हें इंग्रजी टोपण नाव विचित्र वाटलें, एवढें मात्र खरें. त्याचप्रमाणें, Bee हें स्त्रीलिंगी नाव एका 'श्रीयुता' ने घ्यावें, याचाहि अचंबा वाटला ! कालांतराने Bee म्हणजे अकोला येथील 'नारायण मुरलीधर गुप्ते' होत, असें मला प्रा. ना. के. बेहेरे यांजकडून कळलें.

'कमळा' कवितेने मोहनी घातल्यामुळे मीं Bee च्या आणखी कविता मिळण्याचा प्रयत्न केला. 'चाफा', 'वेडगाणें'- वगैरे त्यांच्या कित्येक कविता मला उपलब्ध झाल्याहि. या कविता वाचून Bee हे मराठींतील एक श्रेष्ठ कवि आहेत, याबद्दल माझी खात्री पटली; आणि, त्यांच्या संबंधींचा माझा हा ग्रह उत्तरोत्तर दृढतरच होत गेला.

२ Bee वरील माझा लेख

Bee यांच्या कवितेवर रसग्रहणपर लेख लिहिण्याची कल्पना मला 'काव्यचर्चा' नामक पुस्तकावरून सुचली. पुण्याच्या 'शारदामंदिरा' तर्फे प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकांत बहुतेक ठळक ठळक आधुनिक मराठी कवींविषयीं लेख आले आहेत. दुर्दैवानें त्यांतून Bee तेवढे नेमके वगळले गेले ! ज्या पुस्तकांत रहाळकरांसारख्या अगदी सामान्य कवींचा देखील परामर्ष घेण्यांत यावा, त्यांतून कविवर्य Bee सुटावे, या प्रकाराचें मला अतिशय वैषम्य वाटलें ! म्हणून या दिशेने आपण स्वतः प्रयत्न करण्याचें मीं ठरविलें. प्रथम नागपूरच्या 'हिस्लॉप कॉलेज मॅगेझिन' मध्ये मीं एक छोटेखानी लेख लिहिला. त्याचीच सुधारून वाढविलेली आवृत्ति म्हटली म्हणजे 'रत्नाकर' मासिकाच्या फेब्रुवारी व मार्च १९२९ या महिन्यांच्या अंकांत दोन हप्त्यांनी प्रसिद्ध झालेला माझा 'फुलांची ओंजळ' हा लेख होय. हा लेख माझ्या 'विचारसमीक्षा' पुस्तकांतहि संगृहीत केलेला आहे.

'फुलांची ओंजळ' हा लेख लिहितांना Bee यांजशीं मीं पत्रव्यवहार केला होता व त्यांजकडून कांही शंकांचें निरसन करून घेतलें होतें. प्रसिद्धी—पूर्वी हा लेख त्यांच्या अवलोकनार्थ त्यांजकडे मीं पाठविला होता. परंतु आपल्या अभिजात विनयास अनुसरून त्यांनी तो कांहीहि अभिप्राय व्यक्त न करतां वाचून जशाचा तसा परत केला !!

Bee च्या 'फुलांची ओंजळ' याच नांवाने प्रसिद्ध झालेल्या काव्यसंग्रहाला रा. प्र. के. अत्रे यांनी जी अत्युत्कृष्ट प्रस्तावना लिहिली आहे, तींत माझ्या या लेखाचा गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे. त्यावरून हा लेख काव्यरसिकांस आवडला असावा, अशी कल्पना होते.

३ Bee ची निःस्पृहता

उपरोक्त प्रस्तावनेंत रा. अत्रे यांनीं म्हटल्याप्रमाणे मी Bee यांचा पहिला टीकाकार झालों खरा; पण अजून त्यांची माझी प्रत्यक्ष भेट झाली नव्हती ! तो योग १९३३ च्या उन्हाळ्यांत आला. माझे मित्र रा. हरिभाऊ मोटे यांच्या मनांत Bee यांचा काव्य-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संग्रह प्रकाशित करण्याची उत्कट इच्छा होती. त्याबाबत बोलणें-चालणें करण्यासाठी मीं Bee यांना भेटावें, अशी त्यांनी मला सूचना केली. तदनुसार मी १९३३ च्या जूनमध्ये Bee यांस अकोल्यास जाऊन भेटलों. Bee यांचें हें पुस्तक उमर—खय्यामच्या रुबायांच्या एका उत्कृष्ट आवृत्तीसारखें छापावयाचें, असें मोटे यांनीं ठरविलें होतें. आणि, मोबदल्यादाखल सुमारें ५०० रुपयांपर्यंत कोणतीहि रकम मीं त्यांना कबूल करावी, असा अधिकार त्यांनी मला देऊन ठेवला होता. पुस्तकाच्या बहिरंगाची मीं गोष्ट काढतांच Bee उद्गारले "अहो, बहिरंगाचें काय मोठेंसें आहे ? पुस्तक अगदी भिकार का काढा ना ! त्यांत कांही गुण असल्यास तें आपला प्रभाव दाखवीलच ! "– आणि मोबदल्याचा प्रश्न काढल्याबरोबर ते म्हणाले, " छे, छे, कवितेवर मला छदामहि घ्यावयाचा नाहीं !"

यावेळीं Bee यांच्या पत्नी अर्धांगवायूने आजारी होत्या. त्यांच्या प्रकृतींत फरक पडल्यानंतर कांही संकल्पित कविता लिहूं व मग पुस्तक काढण्याचें ठरवूं, असें Bee यांनी मला सांगितलें. पुढे हें बोलणे तितकेंच राहून Bee यांचा काव्यसंग्रह मुंबईचे त्यांचे आप्त रा. श्री. गो. देशपांडे यांनी १९३४ मध्ये प्रकाशित केला.

४ Bee ची मुलाखत

अकोल्याच्या मुक्कामांत Bee यांच्याशीं माझ्या दोन मुलाखती झाल्या. पहिली मुलाखत झाली ती वेळ रात्रीची ९-९॥ वाजण्याची होती. त्यावेळीं Bee हे 'देशमुख फाईल' नांवाच्या भागांत राहत होते. तो भाग नवीन वस्तीचा असल्यामुळे रस्त्याने विजेचे दिवे नव्हते. यामुळे ठेचाळत ठेचाळत वाट चालावी लागली ! Bee हे अंगणांत खाटेवर बसून धूम्रपान करीत होते. मी गेल्यानंतर आरंभीं औपचारिक प्रश्नोत्तरें झालीं. Bee हे मला शरीराने अत्यंत दुर्बल वाटले. त्यांचें बोलणेंहि फार हळू होतें ! आधीच उतार वय व त्यांत पत्नी अंथरुणाला खिळलेली. यामुळे ते अधिकच खंगले असावे ! थोडें बोलणें–चालणें होतांच त्यांनी चहा घेण्याचा आग्रह केला. परंतु " उदईक सकाळीं पुनः येईन, तेव्हा चहा घेऊं, " असें उत्तर देऊन मीं ती वेळ टाळली. त्यांना रात्रीचा जास्त त्रास देणें योग्य न वाटल्याने त्यांचा निरोप घेऊन मी लौकरच जाण्यास निघालों. 'नको नको' म्हणत असतांहि ते मुख्य रस्त्यापर्यंत कंदील घेऊन पोचविण्यास आले होते !

दुसऱ्या दिवशीं ठरल्याप्रमाणे मी पुनः त्यांच्या भेटीस गेलों. आदल्या रात्रीं राहिलेला चहा त्यांनी स्मरणपूर्वक दिला ! या मुलाखतींत दीड–दोन तास मोकळेपणाने पुष्कळ चर्चा झाली. यावेळच्या बोलण्यांतील दोन–तीन मुद्दे मला अद्यापहि स्मरतात, ते येथे नमूद करतोंः—

'कमळा' कवितेची गोष्ट निघाली असतां Bee म्हणाले, " ही कविता लिहिली, त्यावेळीं मजकडे 'रेव्हिन्यू' दप्तर असल्यामुळे कामाची फार गर्दी होती. 'मनोरंजन' चा 'वसंत–अंक' निघणार होता, त्यासाठी ही कविता लिहावयास घेतली होती. ती अर्धीमुर्धी होऊन तशीच राहिली ! पुरी करण्यास सवडच होईना ! अखेर " कविता तावडतोब पाठवा " अशी रेंदाळकरांची (किंवा मित्रांची) तार आली. म्हणून राहिलेली कविता कशीबशी पूर्ण केली व 'मनोरंजन' कडे पाठवून दिली ! "

— ही हकीकत सांगतांना मागणी आल्याखेरीज आपण सहसा कविता लिहिली नाही, असेंहि Bee म्हणाल्याचें आठवतें. असेंच विधान त्यांनी मला लिहिलेल्या ता. ७-८-१९२८ च्या पत्रांत केलें आहे. त्यांचें सदर पत्र माझ्या 'प्रतिभा' पाक्षिकाच्या १२ जुलै १९३५ च्या अंकांत प्रसिद्ध झालें आहे. Bee यांनी मागणीशिवाय कविता लिहिली नाहीं, याचा अर्थ मी इतकाच समजतों की, मागणी येण्यापूर्वी त्यांच्या मनांत कांही तरी काव्यविषय घोळत होतेच. त्या अमूर्त काव्यविषयांना मूर्त रूप देण्याचें–त्यांना शब्दांत बांधून ठेवण्याचें–कार्य मात्र प्रत्यक्ष मागणीनंतर होत असे. Bee यांनी 'made to order' अशा प्रकारची काव्य रचना केली, असा उपरोक्त विधानाचा अर्थ घ्यावयाचा नाही, हें वाचकांनी ध्यानांत घ्यावें.

याच मुलाखतींत Bee यांनी नाट्य-लेखनाबद्दल आवड व्यक्त केली होती. आपण नाट्यशास्त्र व नाटकें यांचा बराच व्यासंग केला होता, आणि नाट्य-रचना करण्याचीहि आपली उत्कट इच्छा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होती. परंतु प्रतिकूल परिस्थितीमुळे तो योग आला नाही, अशा अर्थाचे उद्गार त्यांनी काढले होते ! कै. विष्णुपंत औंधकर यांनी त्यांना ' महाराष्ट्र नाटक–मंडळी ' साठी नाटक लिहून मागितलें होतें, असेंहि त्यांच्या बोलण्यांत आलें होतें.

चर्चेत मीं विचारलें, " नवीन कवींची कविता कशी असावी, असें आपणास वाटतें ? "

Bee उत्तरले, " माझ्या मतें, नवीन कवींनी ऐतिहासिक विषयांवर काव्यरचना करावी ! "

—Bee यांनी तरुण कवींस केलेली ही सूचना मला तेव्हा पटली नव्हती व आजहि ती पटत नाही; पण त्यांचा दृष्टिकोन समजण्यासाठी ती येथे नमूद केली आहे, एवढेंच.

या भेटीनंतर Bee यांच्याशीं माझी पुनः भेट झाली नाही.

Bee यांचें बाह्य जीवन

साहित्यिक,तत्त्ववेत्ते व शास्त्रज्ञ यांचें जीवन ' कृतिप्रधान ' नसून ' विचारप्रधान ' असतें. या नियमास Bee हेहि अपवाद नाहीत. यामुळे त्यांच्यासारख्यांच्या जीवनाचें 'बाह्य' व 'आंतर' असे दोन विभाग कल्पावे लागतील. Bee यांचें बाह्य जीवन सामान्य कारकुनाचें होतें. त्यांत अघटित असें काय असूं शकणार ? तथापि Bee यांचें व्यक्तिमत्व आकलन होण्यासाठी त्यांच्या बाह्य जीवनाचा आढावा घेणें अत्यवश्य आहे. तसें प्रथम करून नंतर त्यांच्या आंतर जीवनाकडे वळूं.

Beeयांचें व्यावहारिक नांव ' नारायण मुरलीधर गुप्ते ' हें आहे, हें आता सर्वांस ठाऊकच आहे. ते जातीनें चांद्रसेनीय कायस्थ प्रभु आहेत. या जातीने गडकरी व Bee हीं दोन कविरत्नें मराठी भाषेला दिलीं. Bee हे स्वतः ' वऱ्हाडी ' म्हणून गणले जाऊं शकले, तथापि त्यांचें घराणें मूळचें वऱ्हाडचें नव्हे. Bee यांचे वाडवडील कुलाबा जिल्ह्यांतील पेणजवळच्या ' वाशी ' गांवीं राहत असत, असें त्यांचे भाचे व जामात रा. खं. गो. प्रधान हे ता. २२-१२-१९४५-च्या एका पत्रांत लिहितात. या 'वाशी' गावामुळेच त्यांना 'वासकर' असेंहि म्हणत असत. पेण, वाशी–वगैरे पांच-सात गावांचें कुलकर्णीपण Bee यांच्या घराण्याकडे आहे.

Bee यांचे वडील कै. मुरलीधरपंत हे वऱ्हाडांत सुमारें १८५१ मध्ये आले. तेव्हापासून हे 'वासकर गुप्ते' वऱ्हाडचे रहिवासी बनले. मुरलीधरपंत हे कांही उद्योगधंदा शोधण्यासाठी वऱ्हाडांत आले होते. त्याप्रमाणे त्यांना बुलडाणा येथे सरकारी नोकरी मिळाली. कांही वर्षें नोकरी केल्यानंतर मुरलीधरपंतांनी तेव्हाच्या पद्धतीप्रमाणे मराठींतून वकिलीची परीक्षा दिली व ते तींत उत्तीर्णहि झाले. वकिली करण्यासाठी मुरलीधरपंत हे प्रथम यवतमाळ येथे आले. यवतमाळास तेव्हा सास्तीकर, देव-प्रभृति चार-दोन वकील होते. यामुळे मुरलीधरपंतांचा वकिलींत चांगला जम बसला. त्यांनी घर व शेतजमीनहि मिळविली. त्यावेळीं यवतमाळ हा जिल्हा नसून तालुका होता व वणी हें जिल्ह्याचें ठिकाण होतें. अर्थात् यवतमाळ येथे सर्व जिल्हाकोर्टें नव्हतीं. म्हणून पुढे मुरलीधरपंत हे वणी येथे राहण्यास जाऊन तेथे वकिली करूं लागले.

मुरलीधरपंतांच्या पत्नीचें माहेरचें नाव राजूबाई व सासरचें नाव लक्ष्मीबाई असें होतें. या दंपतीस पाच मुलगे व तीन मुली अशीं आठ अपत्यें झालीं. मुलांचीं नावें नारायण, रामचंद्र, केशव, लक्ष्मण व गजानन अशीं आहेत. यांपैकी नारायणराव व गजाननराव या दोघांनी चांगलें नांव काढलें. नारायणराव हे Bee म्हणून प्रसिद्धीस आले व गजाननराव हे ' गजाननमहाराज ' म्हणून लौकिकास चढले. सध्या हे गजाननमहाराज नाशीक येथे वास्तव्य करीत असून त्यांची शिष्यशाखा बरीच पसरली आहे. ' आत्मसाक्षात्कारमार्गप्रदीप ' व आणखी कांही इंग्रजी–मराठी पुस्तकांत गजाननमहाराजांची हकीकत आलेली आहे.

Bee यांचा जन्म बुलडाणा जिल्ह्यांतील मलकापूर येथे जून १८७२ मध्ये झाला. त्यांचें शिक्षण यवतमाळ व अमरावती येथे झालें. प्रापंचिक अडचणींमुळे त्यांना मॅट्रिक देखील न होतां मध्येच शाळेला ' रामराम ' ठोकावा लागला ! त्यांनी मराठींतून वकिलीची परीक्षा देण्याचाहि प्रयत्न केला होता. पण तो सिद्धीस जाऊं शकला नाही.

Bee यांचें लग्न फार लहानपणीं वणी येथील कै. मार्तंडराव प्रधान यांच्या मुलीशीं झालें. हे प्रधान वणीस तहसील कचेरींत कारकून होते. ही मुलगी

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लौकरच वारली. यानंतर Bee यांचा विवाह यवतमाळचे कै. गोविंद रावजी मुळे यांच्या सुंदर नामक मुलीशीं यवतमाळ येथे झाला. गोविंदराव मुळे हे यवतमाळ येथे 'अकौंटंट' म्हणून सरकारी नोकरींत होते. लग्नाच्या वेळीं Bee चें वय सोळा सतरा वर्षांचें असावें. त्यांच्या या पत्नीचें सासरचें नांव सौ. लक्ष्मीबाई असें होतें.

Bee यांचे वडील मुरलीधरपंत हे वणीस वकिली करीत असतां त्यांस अर्धांगवायूचा झटका आला. यामुळे ते कुटुंबियांसह ओषधोपचारासाठी अमरावतीस गेले. तेथेच त्यांचा अंत झाला. एक दोन महिन्यांच्या आंत त्यांच्या पत्नीहि कालवश झाल्या!

याप्रमाणे माता-पित्याचें छत्र नाहीसें झाल्यामुळे, संसाराचा सर्व भार Bee यांजवर येऊन पडला. त्यांची मावशी बाळूबाई ही त्यांच्याजवळच राहत असे. बाळूबाईने घरांतील सर्व व्यवस्था स्वतःकडे घेतली. Bee यांस कुटुंबपोषणासाठी सरकारांत कारकुनीची नोकरी करावी लागली. धाकट्या भावांचें शिक्षण व तीन बहिणींचीं लग्नें त्यांनी शक्यनुसार पार पाडलीं. ते वाशीम, मूर्तिजापुर, अकोला इत्यादि गांवीं बदल्या होत होत गेले. मध्यंतरीं कांही काळ ते नायबतहसीलदाराच्या हुद्यावरहि होते. पण पुनः कारकून म्हणून त्यांची नेमणूक झाली. Bee हे अखेरचीं बरींच वर्षें अकोला येथे होते. तेथेच ते सेवानिवृत्त झाले.

Bee यांस दत्तात्रेय नायक एक मुलगा व तीन मुली अशीं चार अपत्यें आहेत. दत्तात्रेय हा मुंबईस नोकरी करतो. Bee यांची पत्नी सौ. लक्ष्मीबाई या ११ एप्रील १९३४ रोजीं अर्धांगवायूने अकोला येथे निधन पावल्या.

Bee यांचे जामात रा. प्रधान हे छिंदवाडा येथे नाझर असून, सध्या Bee त्यांच्याजवळच राहतात. ते डोळ्यांनी जवळ जवळ अधूच झाले आहेत.

६ Bee चे स्वभावविशेष

Bee यांच्या स्वभावाविषयीं व हल्लीच्या दिनक्रमाविषयीं त्यांचे जामात रा. प्रधान मला लिहिलेल्या ता. २७-२-४६ च्या पत्रांत लिहितातः—

"दादासाहेब (Bee) यांच्यासंबंधीं थोडक्यांत माहिती खालीलप्रमाणे देत आहे; स्वभाव एकांतप्रिय, मितभाषी, भिडस्त, साधा व सरळ आहे. वाचन विशेषतः खालील विषयांचें चांगलें आहेः—तत्वज्ञान, काव्य, नाटक, कादंबरी, समाजसत्तावाद व राज्यशास्त्र. जवळ जवळ आठ-दहा वर्षांपासून अशक्तपणा व मोतीबिंदु यांमुळे वाचन बंद आहे. अधूनमधून वर्तमानपत्र वगैरे वाचून दाखविलीं जातात. बुद्धि तीक्ष्ण आहे; व पूर्वे वयांत बरेंच वाचन झाल्यामुळे थोडेंसें वाचून दाखविल्याने विषयाचें मर्म तावडतोब आकलन होतें. चालू दिनक्रमः— स्वभाव एकांतप्रिय असल्यामुळे बहुतेक काळ मननांत व स्वतःशीं विचार करणांत जातो. वर लिहिलेल्या विषयांवरील वाङ्मय आहे. हें त्यांचें आवडतें वाङ्मय आहे. याशिवाय विशेष आवडीनावडी नाहीत. राहणी अगदी साधी आहे."

Bee हें जन्मतःच कुशाग्र-बुद्धि आहेत. तशांत व्यासंगाने त्यांनी आपल्या बुद्धीची धार अधिकच तीव्र केली आहे. Bee यांचे सहव्यवसायी सांगतात की, इंग्रजी मसुदा (Draft) करण्यांत त्यांचा हातखंडा असे. इंग्रज अधिकारीसुद्धा त्यांच्या मसुद्यावर खूष झाला!

Bee यांच्या बुद्धिमत्तेची एक आठवण आवर्जून देण्याजोगी आहेः कै. डॉ. माधवराव पटवर्धन ऊर्फ कवि माधव ज्युलियन् हे गडकऱ्यांच्या 'प्रेम आणि मरण' कवितेवर कडक टीका करीत असत. या कवितेंतील सारें वर्णन निसर्गाला सोडून आहे, असें ते म्हणत असत! Bee हे गडकऱ्यांचे मोठे चहाते. त्यांनी 'तोडीस तोड' म्हणून पटवर्धनांच्या 'संगमोत्सुक डोह' या कवितेवर प्रतिटीका केली. या कवितेंत डोह हा प्रियकर व नदी ही त्यांची प्रिया कल्पून डोहाची प्रणयभावना प्रस्फुटित केलेली आहे. पण हें वर्णन निसर्गाला अतिशय सोडून आहे. असें Bee म्हणतात! कारण डोह हा नदींत तयार होतो. म्हणजेच तो तिचा पुत्र ठरतो. पुत्राने मातेविषयीं प्रणयातुर होणें हा मात्रागमनीपणाच नव्हे काय? कविसंकेताच्या दृष्टीने पाहिलें, तरी नदीचा प्रियकर समुद्र हा असतो, डोह नसतो!

Bee हे एरवी नम्र व सुस्वभावी असले, तथापि वाङ्मयविषयक चर्चेत ते कुणाचाहि मुलाहिजा ठेवीत नाहीत. त्यांच्या निर्भीड मतप्रतिपादनाने दुखविले गेलेले असे कांही साहित्यिक आहेत।

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कुणीं कविता दाखविल्यास व ती त्याज्य असल्यास Bee त्याला तसें स्पष्टपणें तोंडावर सांगतात! यामुळे तो पचकार जन्माचा वैरी बनतो, हें काय सांगावयास हवें ?

Bee हे गंभीर वृत्तीचे असूनहि 'विनोद-शत्रु' नाहीत. ते प्रसंगोपात्त विनोद करतात: 'वानजी' नावाच्या एका अधिकाऱ्याचा ते 'वानरजी' असा गमतीनें उल्लेख करीत असत, असें त्यांचे एक जुने सहकारी सांगतात!

—याप्रमाणे Bee यांचें 'बाह्य जीवन' थोडक्यांत ग्रथित केलें आहे. Bee चें बाह्य जीवन चार चौघांसारखें असलें, तरी पण त्यांच्या 'आंतर जीवनां'-त पृथगात्मता आहे. या आंतर जीवनामुळेच सामान्य कारकुनी करणारे 'नारायण मुरलीधर गुप्ते' हे 'कविवर्य Bee' होऊं शकले! कसें तें पाहूं.—

७ Bee यांचें आंतर जीवन : अध्यात्म

Bee यांचा ओढा लहानपणापासून अध्यात्म व वाङ्मय या दोन विषयांकडे आहे. Bee हे ईश्वराचें अस्तित्व मानणारे सश्रद्ध गृहस्थ आहेत. तशांत वेदांतपर ग्रंथांच्या वाचनानें त्यांची वृत्ति अंतर्मुख झाली. ते अकोला येथे सरकारी नोकरींत असतांना त्यांचा एका सत्पुरुषाशीं संबंध आला. बुलडाणा जिल्ह्यांत चिखली म्हणून एक तालुक्याचें गाव आहे. या चिखली गावापासून कांही मैलांवर दाट झाडींत व डोंगरांत जांबोरी नावाचें खेडें असून त्यांच्याजवळ 'येलोबा' नामक साधूची समाधि आहे. त्या ठिकाणीं नारायण सरस्वती हें अभिधान घेतलेले एक योगी वास करीत असत. त्यांच्या दर्शनास Bee हे एकदा कुटुंबियांसह अकोल्याहून मुद्दाम गेले होते. हे नारायण सरस्वती म्हणजेच Bee चे बंधु गजानन महाराज यांचे मोक्षगुरु होत.

अशा प्रकारें सत्समागमानें व ग्रंथ-परिशीलनानें Bee हे अध्यात्माकडे झुकले. मला लिहिलेल्या ता. २६-१०-१९४५ च्या पत्रांत त्यांनी "ध्यान-योगाचा आणि तत्त्वचिंतनाचा अभ्यास फार वर्षांपासूनच करीत आलों आहें"— असें स्वच्छ लिहिलें आहे. या आध्यात्मिकतेचा Bee च्या कवितेवर परिणाम झालेला दिसतो, तो हा की, त्यांची कविता तात्त्विक स्वरूपाची तर झालीच आहे, परंतु ती निराशावादापासून सर्वस्वीं अलिप्त आहे, सर्व नोकरींत कारकुनी ही जास्त उरस्फोड करणारी असते. Bee यांच्यावर ऐन तारुण्यांतच संसाराचा मोठा भार येऊन पडला होता. शिक्षण फार न झाल्याने व नोकरीहि सामान्य असल्याने, आप्तेष्टांकडून अवहेलनेखेरीज—किमानपक्षीं उपेक्षेखेरीज— दुसरें कांहीच त्यांच्या वाट्यास आलें नाही. अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत त्यांच्या कवितेवर नैराश्याची दाट छाया पडल्यावाचून राहिली असती काय? परंतु ही आपत्ति केवळ आध्यात्मिकतेमुळे टळली असावी, असें मला वाटतें. आधुनिक कवितेचा फार मोठा भाग निराशावादानें व्यापलेला आहे. रेव्ह. टिळक, Bee—वगैरे अत्यल्प कवि असे आहेत की, ज्यांच्या कवितेंतून आशावादाचेच सूर सदैव बाहेर पडतात. 'लोकशक्ती'-च्या २७-४-१९३६ च्या अंकांत Bee हे एकदा नाशीक येथे गेले असतां तेथील साहित्यिकांशीं त्यांची जी वाङ्मय-चर्चा झाली तिचा अहवाल देण्यांत आला आहे. या अहवालावरून असें दिसतें की, रा. निफाडकर यांनी Bee यांच्या कवितेंत 'आध्यात्मिक निराशा' (Spiritual Despondency) आहे, असा आक्षेप खुद्द Bee जवळच घेतला होता! Bee यांच्या प्रसिद्ध—अप्रसिद्ध सर्व कविता विचारांत घेऊन मला असें म्हणावेंसें वाटतें की, हा आक्षेप सर्वथैव निर्मूल आहे. Bee यांची अवघी कविता आशावादीच आहे. 'पिकलें पान' या अलीकडील कवितेंत त्यांनी **'मला वाटे हा जन्म फुकट गेला'**— असे निराशेचे उद्गार काढले आहेत खरे; पण ते मला अतिरिक्त विनयाचे द्योतक वाटतात. त्यांनी केलेली काव्योपासना इतकी मोलाची आहे की, निदान त्या बाबतींत तरी असे खेदोद्गार काढण्याचें त्यांस कारण नाही. मी हा त्यांच्या विनयाचाच एक भाग समजतों. खेरीज, ही नैराश्याची लहरहि क्षणिक व आगंतुक आहे.

८ Bee चें आंतर जीवन: वाङ्मय

Bee यांच्या आंतरिक जीवनाचें अध्यात्म हें जसें एक अंग आहे, तसें वाङ्मय—सेवा हें दुसरें अंग आहे. Bee यांचें शिक्षण फारसें झालें नसलें, तथापि त्यांनी मराठी, इंग्रजी व संस्कृत या भाषांतील काव्य—वाङ्मयाचा सखोल अभ्यास केलेला आहे.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्राचीन मराठी कवितेचा त्यांचा व्यासंग किती गाढ आहे, याची ग्वाही त्यांची कविताच देईल. जुन्या मराठी कवितेंतील किती तरी सुंदर सुंदर शब्द व वाक्प्रचार त्यांनी आपल्या काव्यांत पेरले आहेत. हा त्या व्यासंगाचाच परिणाम होय. प्राचीन मराठी कवींत ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर व तुकाराम हे कवि त्यांचे विशेष आवडते आहेत. इंग्रजी कवींत ब्रौनिंग, कोलरिज व टेनिसन यांजवर त्यांचा अधिक भर आहे. आणि संस्कृत कवींत भवभूतीवर त्यांचा जास्त भाव दिसतो.

परंतु Bee यांचा व्यासंग केवळ काव्यापुरता मर्यादित नाही. त्यांनी इतरहि अनेक विषयांचें अध्ययन केलेलें असावें, असें त्यांच्या कवितेवरूनहि सहज प्रत्ययास येतें. Bee चे जामात रा. ग. गो. प्रधान यांनी मला लिहिलेल्या ता. २७-२-१९४६ च्या पत्रांतील उतारा मीं पूर्वी दिलाच आहे. त्यावरून त्यांचा व्यासंग किती चौफेर आहे, हें निदर्शनास येईल. स्वतः Bee यांनी मला लिहिलेल्या ता. २-१०-१९४५ च्या पत्रांत असें कळविलें आहे की, कार्लमार्क्सचें चरित्र वाचीत असतां त्यांना त्यावरून, परंतु भारतीय हुतात्म्यांना उद्देशून 'क्षणभर' ही कविता रचण्याची प्रेरणा झाली. मार्क्सकडे Bee यांचें इतक्या जुन्या काळीं लक्ष्य जावें, ही गोष्ट त्यांच्या चौफेर व्यासंगाची द्योतक आहे. Bee यांचे हेडक्लार्क असलेले कै. निळकंठ देवराव डांगे-नागपुरचे सुप्रसिद्ध डॉ. रामकृष्ण निळकंठ डांगे यांचे वडील-हे मला एकदा सांगत होते की, Bee हे नोकरीच्या शेवटीं शेवटीं कायद्याचीं पुस्तकें वाचीत असत ! कायद्याच्या पुस्तकांत मानवी व्यवहाराचें जेवढें विराट् दर्शन होतें, तेवढें तें अन्यत्र कुठेच होत नाही, म्हणून आपण कायद्याचीं पुस्तकें वाचतीं, असा Bee यांनी खुलासा केल्याचें निळकंठराव डांगे सांगत असत ! कदाचित् तरुणपणीं केलेल्या कायद्याच्या अभ्यासाची उजळणी करण्याची लहरहि त्यांस आली असेल ! तात्पर्य, Bee यांचा व्यासंग चौफेर होता व या कारणामुळेच त्यांच्या कवितेला व्यापक व उदात्त स्वरूप आलें आहे, हें विसरतां कामा नये. वर उल्लेखिलेल्या 'लोकशक्ती'—च्या अंकांत Bee यांनी नवीन कवींविषयीं पुढीलप्रमाणे उद्गार काढल्याचें नमूद केलें आहे. "अलीकडल्या या नव्या पिढींतल्या कवींचा व्यासंग मुळींच नाही. इंग्रजी, संस्कृत व मराठी अशा तिन्ही भाषांतील ग्रंथांचें त्यांचें परिशीलन नाही. त्यांच्यापासून मला कांहीहि आशा वाटण्यासारखें मिळत नाही !–" Bee यांचे हे उद्गार कडक वाटण्यासारखे असले, तरी ते अयथार्थ आहेत असें कोण म्हणेल ? या उद्गारांवरून त्यांना व्यासंगाची केवढी मातबरी वाटते, हें स्पष्ट होईल.

९ Bee चें काव्यलेखन

व्यासंगानंतरची पुढची पायरी प्रत्यक्ष लेखनाची. Bee यांनी काव्यलेखनास वयाच्या अठराव्या–एकोणिसाव्या वर्षी आरंभ केला. त्यांची पहिली कविता 'प्रणयपत्रिका' ही असून ती कै. हरिभाऊ आपटे यांच्या 'करमणूक' पत्रांत १८९१ मध्ये प्रसिद्ध झाली होती. यानंतर १९११ पर्यंत Bee यांच्या आठ-दहा कविता लिहून झाल्या असतील. परंतु त्या आता उपलब्ध नाहीत. मध्यंतरीच्या काळांत त्यांनी वर्तमानपत्री गद्य लिखाण केलें होतें, असें समजतें. १९११ मध्ये त्यांनी 'वेडगाणें' ही कविता लिहिली. ती त्याच वर्षी 'मनोरंजन' मध्ये प्रसिद्ध झाली. ही कविता बरेच दिवस संपादकाजवळ पडून होती. पण ती गडकऱ्यांच्या पाहण्यांत येऊन, त्यांना ती फार आवडली व त्यांच्या आग्रहामुळे ती कै. काशीनाथपंत मित्र यांनी प्रसिद्ध केली. 'वेडगाणें' कवितेवर कवीचें 'Bee' हें टोपणनाव प्रथमच छापलें गेलें व तेंच पुढे कायम राहिलें. यवतमाळ येथे 'सऱ्हे' खात्यांत रा विठ्ठल भगीरथ दीक्षित नामक गृहस्थ होते, त्यांचे चिरंजीव शंकरराव हे Bee चे बालमित्र होते. या शंकररावांनीच त्यांना 'Bee' हें टोपणनाव घेण्यास सुचविलें; आणि "कोणत्याहि नावाशीं वाकडें नसल्यामुळे" त्यांनी तें स्वीकारलें ! 'वेडगाणें' ही कविता 'मनोरजनां'-त प्रसिद्ध होतांच जनतेपुढे नव्याने येणाऱ्या या कवीकडे रसिकांचें लक्ष्य ताबडतोब वेधलें गेलें. रेव्ह. टिळक यांनी 'To Bee' ('मधमाशी') ही कविता 'मनोरंजन'—मध्येच प्रसिद्ध करून Bee यांचें स्वागत केलें. 'केसरी' पत्राने 'मनोरंजन'—च्या या अंकाची पोच देतांना प्रस्तुत कवितेचा प्रथम

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उल्लेख केला होता, असें Bee ता. ७-८-१९२८ च्या पत्रांत लिहितात.

यानंतर Bee यांच्या एकापेक्षा एक मनोज्ञ कविता 'मनोरंजनां'—तून व क्वचित् इतरत्रहि प्रगट होऊं लागल्या. 'मनोरंजनां'त यावेळीं टिळक, गडकरी, ठोमरे-प्रभृति उत्तमोत्तम कवींच्या कविता प्रसिद्ध होत असत. असें असतांहि Bee च्या कवितांनी काव्यमर्मज्ञांचें चित्त आपल्याकडे आकर्षित केलें, यावरून त्यांच्या सरसतेची खूण पटेल. Bee ची 'कमळा' १९१४ च्या 'वसंत अंका'—त झळकली असतां तिला कितपत लोकप्रियता प्राप्त झाली असेल, हें मला सांगतां येत नाही. मात्र 'कमळा' काव्य गडकऱ्यांच्या 'राजहंसा'इतकें लोकप्रिय खचित झालें नसावें! गडकऱ्यांची 'राजहंस' कविता व रेंदाळकरांची 'प्रबोधन' कविता यांना मासिकांतून प्रसिद्धि मिळतांच अतोनात लोकप्रियता प्राप्त झाली, परंतु असा प्रकार अलीकडील कवितांच्या बाबतींत होत नाही अशा अर्थाचें विधान रा. वि. स. खांडेकर यांनी एका ठिकाणीं केलें आहे; आणि पर्यायानें 'राजहंस' व 'प्रबोधन' या कवितांचें श्रेष्ठत्व ध्वनित केलें आहे. अलीकडील कवितांचें एक असो, पण Bee च्या 'कमळा' काव्याला देखील अशी 'झटपट प्रसिद्धि' मिळाली नव्हती. पण एवढ्या कारणामुळे 'कमळा' काव्य 'राजहंस' व प्रबोधन' या काव्यांपेक्षा खालच्या प्रतीचें आहे, असें खांडेकर म्हणूं शकतील काय? या तीन कवितांची परस्पर तुलना करण्यासारखें सादृश्य त्यांत कांहीच नाही. तथापि प्रतिभाशक्तीच्या आविष्काराच्या दृष्टीनें पाहिल्यास या तीन्ही कवितांत 'कमळा' फारच वरच्या दर्ज्याची ठरते, असें म्हटल्यावाचून गत्यंतर नाही. 'कमळे'ला झटपट लोकप्रियता मिळाली नाही, याचें कारण तिचें आभिजात्य होय. अभिजात स्वरूपाच्या रचनेचें खरें मोल होण्यास थोडाबहुत तरी काल लोटावा लागतो. आज या तीन कवितांत कोणती कविता सर्वमान्य आहे, असा प्रश्न केल्यास त्याचें उत्तर 'कमळा' काव्याच्या बतीनेच द्यावें लागेल, याबद्दल मला बिलकूल शंका नाही.

१० Bee वरील टीका

'मनोरंजनांत' Bee च्या कविता प्रसिद्ध होत असतां त्यांचा संबंध ज्यांत पूर्णपणें वा अंशतः आला, अशीं टीकेचीं दोन वादळें उठलीं: पहिलें वादळ Bee च्या 'विचारतरंग' कवितेवरून उठलें. या कवितेंतील पुढील चरण आता म्हणींवजाच झाले आहेत:—

> **महाराष्ट्र-कवि-परंपरा**
> **खंड न पडला तिला जरा**
> **उणीव रसिकांचीच परी**
> **आज भासते खरोखरी!**

हे चरण Bee यांनी स्वतःविषयीं लिहिले व ते इतरांस अरसिक समजतात, असा किल्येकांनी गैरसमज करून घेतला! नागपुरचे कवि रा. आनंदराव टेकाडे हे त्यांपैकीच होत. त्यांनी Bee वर टीका करणारी 'आधुनिक कवींची कुरकुर' नावाची कविता ता. १२-१०-१९१२ च्या 'करमणुकी'—त प्रसिद्ध केली. तिला उत्तर देणारी 'अनुकार' ही कविता Bee यांनी लिहिली. टेकाडे यांच्या 'आनंदगीत' भाग पहिला, या पुस्तकास लिहिलेल्या प्रस्तावनेंत रा. अणे यांनी वस्तुस्थिति ठाऊक नसल्यामुळे Bee वर जहाल टीका केली. वस्तुतः उपरिनिर्दिष्ट चरण Bee यांनी स्वतःस अनुलक्षून लिहिले नव्हते. त्यावेळीं आधुनिक कवींवर व त्यांच्या कवितेवर जी निर्घृण टीका होत होती, तिला उद्देशून हे चरण Bee नी लिहिले होते, असा खरा प्रकार आहे.

रा. अणे यांच्या मनाचा उमदेपणा असा की, ते व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे सभासद असतांना त्यांनी Bee यांना मुद्दाम पत्र पाठवून आपल्या टीकेची सदोषता मान्य केली व Bee यांच्या काव्यप्रतिभेचा यथार्थ गौरव केला!

दुसरें वादळ कै. कविवर्य तांबे यांच्या 'ज्ञानांजन' मासिकांतील 'आधुनिक चिंतनपर काव्यें' या लेखमालेनें उठविलें. या लेखमालेंत तांबे यांनी केशवसुतांची 'झपूर्झा', टिळकांची 'अश्रुगुच्छ,' 'त्वां काय पाहिलें सांग,' 'वेडा' आणि Bee ची 'वेडगाणें' या कवितांवर बेगुमान झोड उठविली आहे.! एवढेंच नव्हे तर केशवसुत, टिळक, Bee या कवींना "कविता म्हणजे काय, याची नीटशी अटकळ तरी झाली आहे की नाही, अशी कुशंका मनांत उद्भवते—" असें म्हणण्यापर्यंत तांबे यांची मजल गेली आहे!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तांबे यांच्या या टीकेचे पडसाद किंचित्कदा उमटले आहेत. तांबे यांचे भक्त व चहाते 'झपूर्झा'—वगैरे कवितांना नांवें ठेवतात, याला ही लेखमालाच कारणीभूत झाली आहे.

'विदर्भ वीणा' संग्रहास प्रस्तावना मागण्यासाठी मी कांहीं मित्रांसह के. श्री. कृ. कोल्हटकर यांस भेटलों होतों. त्याप्रसंगीं 'वेडगाणें' कवितेबद्दल कोल्हटकर प्रतिकूल बोलले होते, असें मला नक्की स्मरतें!

तांबे व कोल्हटकर या श्रेष्ठांबद्दल आदर बाळगूनहि मी असें म्हणूं इच्छितों की, 'वेडगाणें' ही मराठी भाषेला भूषणभूत होईल, अशीच कविता आहे!

११ Bee च्या कवितांची मोजदाद

Bee यांनी १९११ ते १९३४ या कालखंडांत एकूण अडतीस कविता लिहिल्या. त्यांचा 'फुलांची ओंजळ' हा काव्यसंग्रह १९३४ मध्ये प्रसिद्ध झाल्याचें मागे सांगितलेंच आहे. या संग्रहांत एकंदर अडतीस कविता आल्या आहेत.

यानंतर १९३५ मध्ये त्यांनी 'गाविलगड' नामक खंडकाव्य लिहावयास घेतलें. परंतु तें अठ्ठावन्न ओळी लिहून होऊन तसेंच अपुरें राहिलें! लिहून झाला तेवढा भाग 'प्रतिभे'—च्या १९३५ च्या विशेषांकांत आला आहे. 'गाविलगडा'च्या एकूण दोन हजार ओळी व्हावयाच्या होत्या. हें काव्य पुरें झालें असतें, तर मराठींत एका अत्युत्तम खंडकाव्याची भर पडली असती.

'गाविलगडा'—नंतर कविप्रतिभा सुप्तच होती. १९४५ च्या नोव्हेंबरांत 'युगवाणी' चा प्रथमांक काढण्याचें प्रारंभीं ठरलें होतें, त्यासाठीं मीं Bee यांना काव्य पाठविण्याची आग्रहपूर्वक विनंती केली. तिला मान देऊन त्यांनी 'पिकलें पान' ही हृदयस्पर्शी कविता नवीन लिहून पाठविली. परंतु इतःपर आपण नवीन रचना करण्यास असमर्थ आहों, असें त्यांनी कळविलें! फार समाधानाची गोष्ट ही आहे की, 'पिकलें पान' कविता लिहिल्यानंतर Bee यांच्या काव्य-प्रतिभेस पुनः बहर आला व त्यांनी आतापर्यंत मजकडे 'पिकलें पान' कविता धरून एकंदर सात कविता पाठविल्या! त्यांचीं नांवें लेखन-कालासह येथे देतों:—

१ 'पिकलें पान'— ता. ६-९-१९४५.
२ 'दोन मी'— ता. २२-९-१९४५.
३ 'स्वैरगीत'— ता. ४-११-१९४५.
४ 'भारतीय जीवन'— ता. १-१२-१९४५.
५ 'अध्यात्म'— ता. २४-१२-१९४५.
६ 'आठवण'— ता. ११-१-१९४६.
७ 'एक दृश्य'— ता २५-२-१९४६.

Bee यांच्या हातून आणखीहि कविता लिहिल्या जातील व त्यांचा दुसरा खंड प्रसिद्ध करण्याचा सुयोग लौकरच येईल, अशी मला खात्री आहे.

Bee च्या 'कमळण' व 'खुळा' या कविता आपल्या पाहण्यांत आल्याचें त्यांचे अकोल्याचे रसिक मित्र रा. रामदास हनुमंत देशपांडे हे सांगतात. परंतु या कवितांचें पुढे काय झालें, हें कळण्यास मार्ग नाहीं! Bee च्या 'ह्यांत काय संशय' या कवितेची मूळ कल्पना या रामदासपंतांचीच होय.

आज मितीस Bee च्या उपलब्ध अशा फक्त शेचाळीस कविता आहेत, असें समजणें भाग आहे. इतकें अल्प काव्यलेखन करून कीर्तीचें अत्युच्च शिखर गाठणारा दुसरा आधुनिक कवि मराठींत झाला नसेल!

१२ 'फुलांची ओंजळ'

'फुलांची ओंजळ' या पुस्तकांत आलेल्या Bee च्या कवितांचें रसग्रहण मीं माझ्या पूर्वोल्लिखित लेखांत केलेलेंच आहे. शिवाय रा. अत्रे यांनी सदर पुस्तकाच्या प्रस्तावनेंत Bee च्या कवितेचें मर्म इतकें सुरेख उघड करून दाखविलें आहे की, आता त्याबाबत फारसें कांहीं लिहिण्यासारखें राहिलेलें नाहीं. येथे भक्त कांहीं महत्त्वाच्या बाबींचा तेवढा थोडक्यांत परामर्ष घेतों.

Bee यांची 'प्रणय-पत्रिका' वगळल्यास त्यांच्या उपलब्ध असलेल्या सर्व कविता प्रौढावस्थेंत लिहिलेल्या आहेत. 'वेडगाणें' कविता त्यांनी १९११ मध्ये म्हणजे वयाच्या एकोणचाळिसाव्या वर्षी—लिहिली. (एकोणचाळिसाव्या वर्षी बिचारे केशवसुत इहलोकची यात्रा संपवून गेले!) त्यांच्या इतर कविता त्यानंतरच्या आहेत. अर्थात् या कविता लिहितांना Bee यांचें जीवितविषयक तत्त्वज्ञान निश्चित झालें होतें, त्यांचीं विविध

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विषयांवरील मतें ठाम बनलीं होतीं. यामुळे त्यांच्या कवितांत विचारांची सुसंबद्धता आलेली आहे. त्यांत धरसोड किंवा अनिश्चिति सहसा आढळणार नाही. Bee यांची विचारांची बैठक मुख्यतः भारतीय वेदांतावर बसविलेली आहे. भारतीय वेदांतांत प्रवृत्तिपर व निवृत्तिपर अशा द्विविध विचारप्रणालि दृष्टिगोचर होतात. किंबहुना, निवृत्तिपर विचार प्रणालीनें प्रवृत्तिपर विचारप्रणालीस गिळून टाकल्या-सारखेंच झालें आहे! धन्यतेची गोष्ट ही की, Bee यांच्या मनावर निवृत्तीऐवजीं प्रवृत्तीचाच पगडा बसला. स्वतःचें लौकिक जीवन कष्टदायक असतांहि Bee च्या कवितेंतून नैराश्याचा सूर उमटूं नये, याबद्दल त्यांची तारीफ करावी तितकी थोडीच आहे! Bee यांचा दुर्दम्य आशावाद पाहावयाचा असल्यास त्यांची 'यमदूतांस' ही एकच कविता वाचावी. ही कविता काव्यदृष्ट्या फारशी उच्च प्रतीची नाही; परंतु Bee यांचा आशाप्रेरक दृष्टिकोन समजावून घेण्यास मात्र ती अतिशय उपयुक्त आहे. ही कविता त्यांनी बालकवि ठोमरे यांच्या डिसेंबर १९११ च्या 'चित्रमयजगत्' मधील 'यमाचे दूत' या कवितेस उत्तर म्हणून लिहिली आहे. बालकवींच्या कवितेचें ध्रुवपद —

बोलवितात। त्रिकाळ यमाचे दूत

असें आहे, तर Bee यांच्या कवितेचें ध्रुवपद —

अखिल जगतांत। आनंद नांदतो मूर्त!

असें आहे! Bee यांच्या या कवितेचें सार, एवढेंच नव्हे, तर त्यांच्या सर्व तत्त्वज्ञानाचा निष्कर्ष पुढील कडव्यांत उतरला आहे: —

आत्मा स्वामी, तूं निभ्रांत
शाश्वत तूं अस्तोदयरहित
उठतां विवेक हा हृदयांत
दूर पळतात—ते भ्याड यमाचे दूत!

Bee यांच्या प्रवृत्तिपरतेचे निरनिराळे पैलु त्यांच्या इतर कवितांत दिसून येतात: 'दीपज्योतीस' या कवितेंत ते म्हणतात: —

होतां वेळ रसप्रसन्न फुटुनी
येतो फुलोरा तिला,
ती आत्मप्रतिमांस निर्मुनि हसे
संहारकालातला!

या चरणांत त्यांनी अमरत्वाविषयींची कल्पना मांडलेली आहे. सजीव सृष्टींतील मानव, पशुपक्षी किंवा वनस्पती (वनस्पती 'सजीव' आहेत, असें आता सिद्ध झालेंच आहे.) हीं प्रत्येकीं स्वतः अमर नसतात; पण नवीनांस जन्म देऊन तीं पर्यायानें अमर होतात, असें या चरणांत Bee यांनी सांगितलें आहे. मृत्यूचें भीषण तांडव सर्वत्र पाहून भयभीत झालेल्या मानवाला या अप्रत्यक्ष अमरत्वाच्या कल्पनेनें त्यांतल्या त्यांत धीर आल्यावाचून कसा राहील? अमरत्वाची ही कल्पना, अर्थातच, अभिनव नाही. 'ज्ञानेश्वरी' च्या १७ व्या अध्यायांतील ओळी पाहा: —

बीज मोडे झाड होये।
झाड मोडे बीजीं समाये॥
ऐसेनि कल्पकोडी जाये।
परी जाति न नशे!॥ ५९

त्याचप्रमाणे, 'पूर्ण की अपूर्ण?' या कवितेंतील अखेरच्या श्लोकांत अपूर्णतेची तरफदारी करून Bee यांनी या अपूर्ण जगांत राहणाऱ्या व म्हणून दुःखी होणाऱ्या मानवाला दिलासा दिलेला आहे. पूर्णता प्राप्त होणें म्हणजे ऱ्हासारंभ होणें किंवा मृत्यूच येणें होय, असा सिद्धांत Bee यांनी या श्लोकांत कथन केला आहे. हाच सिद्धांत 'दीप-ज्योतीस' या कवितेच्या तिसऱ्या श्लोकांतहि आला आहे. पण तेथे '**ऐसा निष्ठुर कायदा सकल या सृष्टीस शासीतसे**'—अशी 'धोक्याची सूचना' देण्यासाठी हा सिद्धांत सांगितलेला आहे, एवढाच काय तो फरक.

Bee यांच्या सामाजिक व राजकीय विषयां-वरील कवितांत त्यांचा प्रवृत्तिपर दृष्टिकोन अन्य रीतीनें, म्हणजे प्राधान्यानें कर्तव्याची जाणीव करून देण्याच्या रूपानें, व्यक्त झाला आहे. 'तीव्र जाणीव' कवितेंत ते अस्पृश्यतेवर जोरदार हल्ला करतात, तर 'डंका' कवितेंत ज्ञानेश्वरादि संतांनी "प्रेमाच्या पायावर समतेची इमारत" रचिल्याची ग्वाही देतात. 'जादू' कवितेंतील पुढील दोन कडवीं तर मला सोन्याच्या दोन चिपांसारखीं बहुमोल वाटतात: —

उभ्या कड्याच्या कपारींत।
कठीण कोसे दडलेत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांस छेदुनी–पटांस निर्मुनि
उघडे जन झाकील अशी।
जादू कोठे मिळेल कशी ?
हृदयाच्या कातळातळीं।
अक्षय जीवन घे उसळी
पाषाणांसी-भेदुनि,प्यासी
जनता ताजी करिल अशी।
जादू कोठे मिळेल कशी ?

'गिरिगान' कवितेंत हिंदुस्थानांतील सुप्त सामर्थ्य जागृत होण्यासाठी त्यावर सर्व बाजूंनी कसे सुख-संवेदक आघात होत आहेत, याचें आशागीत अत्युत्कृष्ट शब्दांत गाइलेलें आहे; तर 'क्षणभर' या कवितेंत हिंदुस्थानांतील महान् हुतात्म्यांचा अप्रत्यक्ष गौरव केलेला आहे. Bee च्या कवितांतून अशीं कैक उदाहरणें देतां येतील.

Bee यांच्या या सर्व कवितांमुळे वाचकांची प्रवृत्तिपर मनोवृत्ति बनण्यास अत्यंत मदत होते. या कविता वाचून वाचकांचा पाहण्याचा दृष्टिकोन आशापूर्ण असा बनतो आणि ते मनाने कणखर होतात. मला वाटतें, Bee यांच्या कवितेचा हा सर्वाधिक महनीय विशेष होय. एका आंग्ल कवीने आपला काव्य हेतु स्पष्ट करतांना "जेथे अंधकार असेल, तेथे प्रकाश-किरण सोडणें व जेथे मंद प्रकाश असेल तेथे तो अधिक उज्ज्वल करणें हें माझ्या कवितेचें उद्दिष्ट आहे," अशा अर्थाचे उद्गार काढले आहेत. Bee यांच्या कवितेचें तंतोतंत हेंच ध्येय आहे आणि तें पूर्णपणें सिद्धीस गेलें आहे, हें त्यांच्या कवितेचा कुणीहि निःपक्षपाती वाचक कबूल करील. Bee यांच्या वेळचे बहुतेक मराठी कवि नैराश्याचीं रडगाणीं गाण्यांत गुंग झालेले होते, ही वस्तुस्थिति दृष्टीसमोर ठेवली, म्हणजेच त्यांच्या प्रवृत्तिपरतेचें यथार्थ महत्त्वमापन करतां येईल. या पार्श्वभूमीखेरीज त्यांच्या प्रवृत्ति-परतेचें चित्र वठावें तितकें रंगदार वठणार नाही.

बरें, तात्त्विक विचार–सरणीच्या आहारीं जाऊन Bee यांनी आपल्या कवितेच्या कलांगाकडे दुर्लक्ष केलें म्हणावें, तर तसेंहि आढळांत येत नाही. त्यांनी आपले बहुतेक तात्त्विक विचार प्रथम कल्पकतेच्या तेजोरसांत बुचकाळले व नंतरच ते वाचकांपुढे ठेवले. उपलक्षणादाखल 'दीपज्योतीस' ही कविता घ्याः पुनर्विवाह न करणाऱ्या एका तरुण व सुंदर विधवेस अनुलक्षून ही कविता लिहिलेली आहे. पण या कवितेंत त्या विधवेवर दीपज्योतीची व रूढीवर पाषाण–मूर्तीची कल्पना करून, कवीने या साध्या व रूक्ष विषयास एकदम काव्यमय स्वरूप प्राप्त करून दिलें आहे. 'चांदणी' या दुसऱ्या कवितेविषयींहि असेंच म्हणतां येईल. ही कविता बालकवि ठोमरे यांना आधुनिक मराठी कवींचे प्रतिनिधि समजून आधुनिक कवितेवर लिहिलेली आहे. अशीच कल्पकता 'गिरिगान' कवितेंतहि प्रगट झाली आहे.

फुटकळ अर्थालंकारांच्या रूपाने तर Bee ची कल्पकता त्यांच्या कैक कवितांत व्यक्त झालेली आहे.

जी गोष्ट कल्पनेची, तीच भाषा सौंदर्याची. Bee यांची भाषा राजकन्येसारखी वैभवशाली असते. जुन्या मराठींतील सुंदर सुंदर शब्द व वाक्प्रचार यांचा समर्पक उपयोग करणें हें Bee यांच्या भाषाशैलीचें वैशिष्ट्य होय भाषा–सौष्ठवाबाबत Bee हे अर्वाचीन काळांतील 'मुक्तेश्वर' होत, असें म्हटल्यास ती खचित अत्युक्ति होणार नाहीं.

'फुलांची ओंजळ' पुस्तकांतील कोणत्या कविता मला सर्वांत जास्त आवडल्या, असें कुणी मला विचारल्यास, मी गुणानुक्रमानें 'कमळा' 'वेडगाणें' 'चाफा', 'फुलांची ओंजळ', 'माझी कन्या', 'चांदणी', 'गिरिगान' व 'दीपज्योतीस' या कवितांकडे अंगुलिनिर्देश करीन. 'कमळा' कवितेंत Bee च्या प्रतिभेची परिसीमा झाली आहे. आधुनिक मराठी कवितांतील पांच सर्वोत्कृष्ट कविता निवडावयाच्या झाल्या, तर त्यांत 'कमळा' काव्यास स्थान द्यावें लागेल, असें मी Bee वरील माझ्या लेखांत म्हटलेलें आहे. माझें तें मत अजूनहि कायम आहे, हें सांगण्यास मला समाधान वाटतें.

१३ 'फुलांच्या ओंजळीं'–नंतर

'फुलांची ओंजळ' पुस्तकानंतर Bee यांनी ज्या आठ कविता लिहिल्या, त्यांत पूर्वीची चमक राहिली नाही, असें मी म्हटल्यास त्यांत Bee यांस कमीपणा येण्यासारखें कांहीच नाहीं. वयपरत्वें प्रतिभेची ज्योत मंदावल्यास त्यांत आश्चर्य तें कोणतें? बाकी, या कवितांत देखील Bee यांची पृथगात्मता क्वचित् उमटून दिसतेच. 'गाविलगड' कवितेंतील

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

क्षितिजाच्या कंकणीं ललित
लघु तारा जणु विमल
वेलीच्या पालवींत फूल
तसें गाव एक हें नदीच्या
वाकणांत राहे
पाणी बारमास वाहे

—ही कल्पना, किंवा ' आठवण ' कवितेंतील

काळी तरुराजी क्षितिजावर
दिसली त्या अवकाळीं
हरिणीच्या नेत्रांतिल जणु
का काजळ-रेषा काळी

—ही कल्पना Bee यांची प्रतिभा अजूनहि प्रसंगोपात्त झळाळून उठते, हें दर्शविते. Bee यांचा महाराष्ट्रासंबंधींचा व हिंदुस्थान-संबंधींचाहि अभिमान ' भारतीय जीवनां '-त प्रस्फुट झाला असून, ' दोन मी ' मध्ये तमोगुणी व मानवता-विरोधी पाश्चिमात्य संस्कृतीचा त्यांनी धिःकार केला आहे. ' एक दृश्य ' कवितेंतील—

शरीरांत असतीं तत्त्वें
का जीं जाणिव घेवोनी
अंतराळ-मार्गानें जातीं
त्वरित इच्छिल्या स्थानीं ?

ही मध्यवर्ती कल्पना किंचित् गूढ, पण रमणीय आहे. या सर्व कवितांत मला ' भारतीय जीवन ' कविता अत्युत्तम वाटली. तिच्यांत विचाराचा व भाषेचा ठाशीवपणा आलेला आहे. एखाद्या उत्कृष्ट प्राचीन स्तोत्रासारखी ही कविता वाटते. तिच्यांतील ' शब्दगुंड ' शब्द मौजेचा आहे !

१४ Bee चें द्रष्टेपण

Bee यांच्या कवितेंत विचार-प्रवणता आहे, यामुळे कित्येक रसिक त्यांजवर नाराज आहेत ! विचार-प्रवणता म्हणजेच भावनेचा दुष्काळ, असें समीकरण या लोकांनी बसवून टाकलें आहे ! Bee यांच्या कवितेंत भावनेचा उथळ खळखळाट नाही, ही गोष्ट खरी आहे. परंतु तींत भावनेचा अगदी खडखडाट आहे असें समजणें मात्र चुकीचें आहे. Bee यांनी प्रदर्शित केलेले पुष्कळ विचार हे ' भावगर्भ ' आहेत. हे भावगर्भ विचार ते कल्पनेच्या साह्यानें मांडतात, म्हणूनच त्यांच्या कविता इतक्या मनोज्ञ वाटतात. रामदासाचे ' मनाचे श्लोक ' किंवा पोपचें ' Essay on Man ' या पद्यात्मक प्रबंधासारख्या त्यांच्या कविता नाहीत हें कुणासहि उघड उघड दिसून येईल.

उलटपक्षीं, भावगर्भ विचार कल्पकतेच्या साह्यानें कवितेंत मांडून Bee यांनी नव कवितेचें शिंग फुंकिलें आहे, असें मला म्हणावेंसें वाटतें. नव कविता ही भावनेपेक्षा विचाराला अधिक प्राधान्य देणार आहे. फक्त हे विचार नीरस न वाटण्यासाठी भावगर्भ राहतील, इतकेंच. दिवसेंदिवस शिक्षण व सुसंस्कृतता आपल्याकडे वाढत आहे. सुशिक्षित व सुसंस्कृत व्यक्ति विचार-गंभीर असेल की भावनावश असेल ? आणि ती जरी भावनावश असली, तरी पण आपल्या भावनांचें प्रदर्शन ती अतिशय संयमानें करील हें उघड आहे. अशा वाचकांसाठीं लिहिली जाणारी नव कविता भावगर्भ विचार प्रदर्शित करण्यावरच विशेष भर देईल. आणि, ज्यावेळीं ती भावना व्यक्त करील, त्यावेळीं त्या भावना संयमानेच व्यक्त केल्या जातील. तुकाराम आपल्या अभंगांत जसा टाहो फोडतो, किंवा गडकऱ्यांच्या 'राजहंस' कवितेंतील विधवा आई जशी धाय मोकलून शोक करते तशा प्रकारचें भावनोन्मीलन नव कवींच्या नव कवितेंत इतःपर आढळणार नाही—निदान आढळावयास नको आहे. कवितेंत भावगर्भ विचार कसे मांडावेत, अथवा संयमित भावना कशा प्रगट कराव्या, याचा वस्तुपाठ म्हणजेच Bee यांच्या कविता होत. १९११ ते १९३४ या कालखंडांत प्राचुर्यानें काव्य-लेखन केलेल्या Bee नी इतक्या जुन्या काळीं भावी कवितेचें स्वरूप हेरून तदनुसार रचना केली, ही गोष्ट त्यांना द्रष्टेपणा आणून देणारी अशी आहे. त्याबद्दल त्यांचा गौरव करण्या-ऐवजीं त्यांच्या कवितेंत भावनाच नाहीत, म्हणून नाक मुरडणाऱ्या तथाकथित रसिकांच्या रसिकतेची कींवच केली पाहिजे !

१५ Bee चा मात्रादोष

Bee यांच्या कवितेचा एकच मोठा दोष आहे, तो वृत्तशैथिल्य हा होय. त्यांच्या अक्षरगणवृत्तांतील

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कविता अत्यंत शुद्ध आहेत. परंतु मात्रावृत्तांतील ऊर्फ जातींतील त्यांच्या कविता मात्र दोषसंकुल आहेत! त्यांत यतिभंग तर होतातच, पण मुख्यतः मात्रा कमी अधिक भरतात. अर्थात् खुद्द Bee यांना या दोषाची जाणीव नाही, असें नाहीं. त्यांना त्याची पूर्ण जाणीव आहे. परंतु मात्रावृत्तांसंबंधीं त्यांची निराळी विचारसरणी आहे. यामुळे त्यांनी हे दोष मुद्दाम राहूं दिले, असें दिसतें. नव्हे, त्यांना मुळीं हे 'दोष' वाटतच नाहीत! मला लिहिलेल्या ता. २६-१०-४५ च्या पत्रांत ते म्हणतात "यतिभंग, मात्रा दोष माझ्या हातून निष्काळजीपणाने झाले नाहीत. मला मात्र कळत नाहीत, मात्र मोजतां येत नाहीत, असें कसें बरें म्हणतां येईल? **एवढेंच कीं, दुसऱ्या कशाच्यापेक्षा तरी मी त्यांना जास्त महत्त्व देत नाहीं.**" त्याचप्रमाणे, ता. २३-१२-४५ रोजीं पाठविलेल्या "लोकगीतें आणि यतिमात्रा" या टिपणांत ते म्हणतात, "प्राचीन कालापासून तों आजपर्यंत जीं लोकगीतें आहेत त्यांत ज्याला साधारणतः मात्रा म्हणतात, त्यांचा नियम नसतो. कारण ज्या चालीवर तीं गीतें म्हटलीं जातात, त्या चालींप्रमाणे ऱ्हस्व अक्षर दीर्घ होईल, किंवा दीर्घ अक्षर ऱ्हस्व होईल... मात्रांची मर्यादा दोन ते चारपर्यंत कमीजास्त झाल्यास तें (गीत) अशुद्ध होणार नाही." Bee म्हणतात तद्वत्, जुनीं लोकगीतें शिथिल असतात, हें खरें आहे. परंतु त्यावरून नवीन कविता अशी शिथिल असवी, असा निष्कर्ष काढतां येत नाही. तें कांही असो, Bee यांनी मात्रावृत्तांतील कवितांत **दुसऱ्या कशाला तरी** महत्त्व देऊन म्हणा, अगर विशिष्ट विचारसरणीमुळे म्हणा, क्वचित् शैथिल्य राहूं दिलें आहे, एवढें निःसंशय.

'नागेश' कवितेंतील पांचव्या श्लोकांत पहिल्या दोन चरणांमध्ये यमक साधलेलें नाही. दुसऱ्या चरणांतील 'होईल शंका नको' हे शब्द फिरवून 'शंका नको होइल' अशी रचना केल्यास 'र-ल'चें गौण, पण रूढ यमक साधलें जाईल, असें मीं Bee यांस फार पूर्वी सुचविलें होतें. परंतु निर्यमकतेचा पुरस्कार करणाऱ्या नागेशांवर लिहिलेल्या कवितेंत एखाद्या ठिकाणीं तरी यमक न साधण्यांत औचित्य आहे, असें Bee नी मला तेव्हा कळविलें होतें!

१६. "मला वाटे हा जन्म धन्य झाला!"

आधुनिक मराठी कविमंडळांत Bee यांचें स्थान मानाचें व स्वतंत्र आहे. वाचकांत आशावादी व कणखर वृत्ति निर्माण करणारा, भावगर्भ विचार कल्पकतेने प्रगट करणारा आणि भाषेवर असामान्य प्रभुत्व असणारा कवि म्हणून Bee यांचें नाव मराठी साहित्यांत अजरामर होणार आहे. स्वतः त्यांनी 'पिकलं पान' कवितेंत—

काव्यदेवी-देउळीं-गर्भभागीं
शिरूं शकलों मी ना कधी अभागी!
मुखश्रीचें एकान्त दर्शनाचें—
सुख स्वप्नांतहि तें न मिळायाचें!

असे उद्गार काढले आहेत. पण ते त्यांच्या विनयाचे द्योतक आहेत, असें समजलें पाहिजे. Bee हे काव्यदेवीच्या देवळाच्या गाभाऱ्यांत थेटपर्यंत गेलेले आहेत, एवढेंच नव्हे, तर त्यांना तिच्या मुखश्रीचें 'एकान्त दर्शन' घेण्याचें भाग्यहि प्राप्त झालें आहे, अशी त्यांच्या कवितेचा कोणताहि रसिक वाचक त्यांस खातरजमा देईल. अर्थात् त्यांनी **'मला वाटे हा जन्म फुकट गेला'**— असें समजण्यापेक्षा

"मला वाटे हा जन्म धन्य झाला!"

असें समजणें हेंच सत्यास अधिक धरून होणार नाही काय?

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

Bee यांच्या सहवासांत—

१ रा. ह. देशपांडे
२ त्र्यं. ब. पुराणिक, बी. ए.

१

अकोल्याचे रा. रामदासपंत देशपांडे हे Bee यांचे फार जुने स्नेही आहेत. ते स्वतः काव्यप्रेमी रसिक आहेत. Bee च्या 'ह्यांत काय संशय' कवितेची मध्यवर्ती कल्पना त्यांचीच असून Bee यांनी तसा उल्लेख, ही कविता 'मनोरंजना'त छापतांना, केला होता.

अगदी परवा-परवापर्यंत कविश्रेष्ठ Bee चा तो सात्विक, गंभीर, निगर्वी आणि प्रेमळ असा सहवास लाभण्याचें सद्भाग्य माझ्या वाटेला आलें आहे. मध्यंतरीं ते अकोला सोडून गेले होते. पण इ. स. १९४२ च्या सुमारास ते पुनः अकोला येथे प्रकृतीच्या स्वास्थ्याकरता म्हणून येऊन आपल्या नातवाकडे चार-सहा महिने मुक्कामाला राहिले होते. त्यामुळे माझा बराचसा वेळ त्यांच्या सहवासांत जाऊं लागला.

त्याच वेळची गोष्ट. संध्याकाळची वेळ होती. एक दिवस Bee अचानकपणें मला टांग्यांतून जातांना आढळले. जवळच बाजूला एक ताज्या फुलांचा हार पडलेला होता. Bee च्या हातांत फुलांचा मोठा गुच्छहि दिसला. एकंदर दृश्य मला मोठें नवलाईचें वाटल्यावरून मीं साहजिकच त्यांच्याजवळ " हा काय प्रकार आहे ? "—अशी चौकशी केली. तेव्हां कळलें की, तो दिवस कवि-श्रेष्ठ Bee यांच्या सादर-सत्काराचा होता. त्या दिवशीं अकोला येथील 'बाबूजी देशमुख वाचनालया'-मध्ये 'वाङ्मयोपासक मंडळा'-तर्फे Bee चा जाहीर सत्कार-समारंभ साजरा करण्यांत आला होता.

हें ऐकून मला मोठें समाधान वाटलें व मीं तें तसें Bee जवळ बोलूनहि दाखविलें. परंतु Bee च्या बोलण्यावरून त्यांना मात्र हा 'प्रसंग' कितपत रुचला असेल, याची मला शंकाच वाटली ! याला कारण अर्थात्च त्यांची ही प्रसिद्धि-पराङ्मुख व संकोची वृत्ति होय !

Bee चा माझा परिचय फार जुना असल्या-मुळे त्यांच्या स्वभावांतील संकोचीपणा मी जाणून आहें. मात्र Bee हे संकोची वृत्तीचे असले, तरी पण बरेच वेळां त्यांचा स्पष्टवक्तेपणाहि उसळी मारून वर येत असतो ! एके दिवसाचा प्रसंग आहे : त्यांनीं एका होतकरू कवीला अगदी तोंडावर निर्भीडपणें सांगितलें, " हें पाहा, तुमची कविता फारच सामान्य दर्ज्याची अशी वाटते. तुम्ही आम्हांला प्राथमिक शाळेंत शिकणारे लहान-लहान विद्यार्थि का समजतां ? " आणि, लगेच थोड्या वेळाने, त्यांनीं आपण होऊन काव्यासंबंधींच्या सांगोपांग विवेचनाला सुरवात केली व शेवटीं त्या होतकरू कवीचें पुरेपूर समाधानहि पण करून टाकलें !

भेटीस येणाऱ्या प्रत्येक होतकरू कवीला ते खालीलप्रमाणे ठराविक साच्याचे प्रश्न करतात: " जुन्या मराठी वाङ्मयाचे तुम्हीं कांही अध्ययन केलें आहे का ? आतापर्यंत तुम्हीं कोणते संस्कृत कवि वाचले ? पाश्चिमात्य कवींपैकीं तुम्हीं कोणा-कोणाचा अभ्यास केला आहे ? "—वगैरे वगैरे.

जुन्या मराठी वाङ्मयावर त्यांचा विशेष भर आहे. ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, वामनपंडित, रघुनाथपंडित, मोरोपंत—इत्यादि थोर कवींबद्दल त्यांना अतोनात आदर आहे, हें सांगणें नकोच. परंतु त्यांच्याशिवाय रामजोशी, होनाजी बाळ-वगैरे लावणीकारांबद्दलहि त्यांस फार जिव्हाळा वाटतो.

Bee यांच्या स्वतःच्या बहुतेक कवितांवर जुन्या मराठी वाङ्मयाच्या सखोल अध्ययनाचे नाटक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संस्कार दिसून येतात. प्राचीन मराठींतील अर्थपूर्ण व ओजस्वी शब्दसंपत्ति काळाच्या प्रवाहांत लुप्तप्राय होऊं नये, म्हणून आपण ती स्वतःच्या कवितेंतून मुद्दाम ठेवीत आहों, नव्हे, हेंच आपल्या कवितेचें वैशिष्ट्य आहे असें Bee मोठ्या अभिमानाने केव्हा केव्हा म्हणत असतात !

\+ + +

एके दिवशीं—बहुधा रविवार असावा—Bee अकस्मात् दुपारीं मजकडे आले व म्हणाले, " चलता का, आपण रावसाहेब जोगांकडे थोडावेळ जाऊन येऊं. ' माधव ज्यूलियन् ' आज येथे आले आहेत. ते सकाळीं माझ्याकडे येऊन गेले, परंतु मी घरीं नसल्यामुळे भेट होऊं शकली नाही. म्हणून त्यांनी मुद्दाम घरीं पत्र लिहून ठेवलें आहे व त्यांत माझ्या भेटीची उत्कट इच्छा व्यक्त केली आहे. चला असे प्रसंग कांही वरचेवर येत नसतात ! " यावर कांहीएक आढेवेढे न घेतां मी एकदम त्यांच्याबरोबर जाण्यास निघालों. रावसाहेब जोगांकडे आम्ही जातों तों मंडळी जेवावयास बसली होती. जेवण होतांच ' माधव ज्यूलियन् ' बाहेर आले व त्यांनी Bee चें मोठ्या आदरानें स्वागत केलें. जवळजवळ अर्धातास आम्ही बोलत होतों. बोलण्याचा विषय-Bee ची कविता व माधव ज्यूलियन्चा उर्दू-फार्शी शब्द वापरण्याचा हव्यास- हा होता. माधव ज्यूलियन् यांना Bee यांच्या कवितेबद्दल फार आदर वाटत असल्याचें दिसतें. शेवटीं निरोप घेतांना " तुमची कविता श्रेष्ठ प्रतीची असून, महाराष्ट्रांत कवि या नात्याने तुमचा दर्जा फार मोठा आहे "-असें माधव ज्यूलियन् यांनीं Bee यांना समक्ष बोलून दाखविल्याचें मला अजूनहि आठवतें.

\+ + +

Bee यांच्या आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या बहुतेक कविता प्रसिद्धीपूर्वी त्यांनी मला वाचून दाखविल्या आहेत. कांही कांही कविता तर माझ्या-तर्फेच मासिकांकडे पाठविण्यांत आल्या ! 'मनोरंजन', 'विविधज्ञानविस्तार', 'महाराष्ट्र-साहित्य' वगैरे मासिकांच्या मागण्या इतक्या निकडीच्या असत की, Bee यांना वेळेच्या अभावीं आपल्या कवितांवर सफाईचा हात फिरविण्याचीहि फुरसद मिळत नसे ! त्यांना त्या कविता जशा लिहिल्या, तशाच प्रसिद्धीसाठी पाठवाव्या लागत असत ! या बाबतींत त्यांची कुरकुर नेहमीचीच असे !

अपूर्ण कवितेबद्दल कोणीं चौकशी केली, किंवा ती पाहण्याची इच्छा प्रदर्शित केली, तर ते " कविकन्यकेला नग्नावस्थेंत पाहणें इष्ट आहे का ? " असा मार्मिक प्रश्न करीत असत !

' कमळण ' व ' खुळा ' नावाच्या Bee यांच्या दोन अपूर्ण कविता मीं त्यांच्याकडे वाचल्याचें स्मरतें. ' खुळा ' कवितेंतील दोन ओळी मला आठवतात, त्या अशाः—

कोणी एक खुळा करीत
बसला माळा कधींपासुनी

\+ + +
\+ + +

केव्हा सूत्र तुटोनि साग्र
रचना उन्मोलुनी ढासळे !

या कवितेची मध्यवर्ती कल्पना पुढीलप्रमाणे होतीः कोणी एक खुळा आपल्या इष्ट देवतेची—स्वातंत्र्य देवतेची—पूजा करीत आहे. खुळेपणानेच का होई ना, पण उन्मनस्क मनःस्थितींत तो आपल्या कार्यप्रणालीच्या कमनीय कुसुमांची माला गुंफून तिने आराध्य देवतेची पूजा बांधूं पाहत आहे, परंतु त्या खुळ्याची माळच अजून पुरी होत नाही ! माळ गुंफून पुरी होण्याच्या मार्गांत नित्य नव्या अडचणी येतात. फुलें ओवतांना कधी तीं चुरडलीं जात, कधी बाजूला ठेवलेल्या फुलांतील कांही फुलें सोसाट्याचा वारा अवचित उडवून नेई, हीं फुलें तो खुळा पुनःपुन्हा गोळा करूं लागे, कधी अर्धीमुर्धी माळ तयार होतांच सूत्र तुटून सारींच फुलें ओघळून जात—असे अनेक प्रकार घडून येत असत. यामुळे त्या खुळ्याच्या माळ गुंफण्याच्या कार्याला एकसारखा खंड पडे ! याच कारणाने त्या खुळ्याची ती माला अपूर्ण राहिली व त्याची इष्ट देवतेची पूजाहि पण अपूर्णच राहून गेली ! आणि, मला वाटतें, कवीचें काव्य देखील त्याच कारणामुळे अपूर्ण राहिलें !! अपूर्ण-सारेंच अपूर्ण—!!

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'खुळा' ही कविता Bee यांनी फार दिवसांपूर्वी लिहावयास घेतली होती. ती त्यांना आज आठवते की नाही, याबद्दल मला कांहीच सांगतां येत नाही.

'कमळण' कवितेंत अशीच कांही रम्य कल्पना असावी, असें मला अंधुक अंधुक आठवतें. पण नक्की काय, तें स्मरत नाही!

\+ \+ \+

Bee यांची कविता तात्त्विक, संस्कृत शब्द-प्रचुर व म्हणून दुर्बोध वाटते, असे आक्षेप कित्येक टीकाकारांकडून घेतले जातात. त्याबद्दल मीं Bee यांना विचारलें असतां ते म्हणाले, " हा दोष माझा नाहीं. आजकाल वाचकांना आराम खुर्चीवर बसून चहाचा पेला तोंडाला लावतां लावतां सहज नजर टाकतांच लक्ष्यांत येईल अशी साधी-सोपी कविता वाचण्याची सवय झाली आहे! त्यांना माझी कविता क्लिष्ट व दुर्बोध वाटल्याशिवाय कशी राहील?–पण हा दोष माझा का आहे?–माझी कविता वाचकाला अभ्यास मागते माझ्या भूमिकेच्या समपातळीवर आल्याखेरीज ती सहजासहजीं कळणें शक्यच नाही!"

— आपल्या अर्थ-गौरवाने युक्त अशा कवितेबद्दल कवीचा हा केवढा आत्मविश्वास!

\+ \+ \+

एक दिवस Bee यांच्या 'चाफा' कवितेबद्दल त्यांच्याशीं सहज बोलणें सुरू झालें. कविता उत्कृष्ट आहे-वगैरे औपचारिक स्वरूपाचें बोलणें आटोपल्यावर मीं त्यांना खोडसाळपणाने मुद्दाम विचारलें, " कवितेंत दाखविलेली ' दिव्य प्रीति ' सत्य सृष्टींत पाहावयास मिळते काय? — ती कल्पना सृष्टींतच केवळ आढळेल, अशी नाही काय?" — यावर Bee गंभीरतेने पण किंचित् भावपूर्ण स्वरांत म्हणाले," नाही. तसें नाही. माझ्या कवितेंतला आशय सत्य सृष्टींत आढळणारा, नित्याच्या अनुभवावर उभारलेला असाच आहे. त्यांत सत्याभास, अतिशयोक्ति किंवा कल्पनेच्या भराऱ्या मुळींच नाहीत. आजकाल शुद्ध प्रेमाचा आढळ सहसा होत नाही. आजकालचें प्रणयी जीवन कृत्रिम होत चाललें आहे. त्यांत ' दिव्य-प्रीती ' चा साक्षात्कार होत नाही. म्हणूनच तुम्हाला माझ्या कवितेंत सत्याविष्करण सहजपणें होणार नाही."

Bee चें उत्तर ऐकून मी जरा वेळ स्तब्ध झालों. पण अखेर मला त्यांचें म्हणणें पटलें. Bee यांच्या कौटुंबिक जीवनाचा मला उत्तम परिचय होता. त्यांच्या घरीं माझें नेहमींच जाणें-येणें असे. यामुळे Bee यांच्या पत्नी कै. सौ. लक्ष्मीबाई यांच्या निस्सीम प्रेमळ स्वभावाची मला चांगलीच ओळख झाली होती. या पति-पत्नीच्या अन्तःकरणाचा एक-जिनसीपणा मला इतरत्र कोठेच पाहावयास मिळाला नाही, असें मीं म्हटल्यास ती अतिशयोक्ति होणार नाही!

Bee यांची पत्नी निवर्तल्यानंतर त्यांची माझी भेट झाली, त्यावेळीं मी म्हणालों, " तुमच्या उतार वयांत तुमच्यावर हा दुर्धर प्रसंग ओढवला आहे. तुमचें सांत्वन करण्यास आम्ही असमर्थ आहों. पण तुम्ही सर्व जाणतांच–आम्हीं जास्त काय सांगावें?" यावर ते फक्त एवढेंच म्हणाले," काय करणार?–आता आपलें म्हणायला अधिकाराचें असें माणूस राहिलें नाही, एवढें मात्र खरें!"

पत्नी-वियोगाचा त्यांच्या मनावर केवढा आघात झाला होता, हें त्यांच्या या त्रोटक उद्गारावरूनहि माझ्या निदर्शनास आलें!

\+ \+ \+

Bee यांचें समग्र जीवन सरळ, शुद्ध व प्रेमळ आहे. त्यांना एकांतवासच अधिक प्रिय आहे. प्रसिद्धीपासून तर ते नेहमीच दूर पळाले आहेत! आपल्या अंगच्या गुणांचें मोल पदरांत पाडून घेण्याचा व्यावहारिकपणा त्यांना कधीच साधलेला नाही! किंबहुना, त्यांच्या हळुवार वृत्तींना या गोष्टी मुळीं झेपल्याच नसत्या! Bee यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध करावा, अशी पुष्कळांची इच्छा होती व ती ते पत्रद्वारें वा समक्ष त्यांच्यापाशीं प्रदर्शितहि करीत. पण Bee हे या मुद्यावर प्रायः मुग्धच असत! एका प्राध्यापकाला मात्र त्यांनी खुलासेवार उत्तर देऊन आपला मनोदय विशद केल्याचें मला आठवतें. त्या पत्रांतील पुढील आशयाचें वाक्य वाचकांसमोर ठेवल्यास त्यांना त्यांच्या अंतरंगाची कल्पना येईल, असें मला

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाटतें. तें वाक्य असें:—

"मला जनतेपुढे आणूं नका; नाहीतर मी मरूनच जाईन !"

तथापि योगायोग जबरदस्त होता; आणि, Bee यांना आपल्या ह्यातींतच स्वतःचा काव्यसंग्रह प्रसिद्ध झालेला पाहावा लागला !

त्यांच्या टोपणनावामागेहि असाच कांही तरी इतिहास असावा, अशी कोणास शंका येईल. स्वतः मला ती आली होतीच. म्हणून Bee यांजपाशीं मीं चौकशी केली. तेव्हा त्यांजकडून कळलें की, रा. दीक्षित या नावाचे गृहस्थ त्यांचे शेजारी होते. त्यांच्या आग्रहावरून त्यांनी Bee हें नाव स्वीकारलें व तेंच त्यांस कायमचें चिकटलें ! **'सहजाचा देव। सहजाची आरती'**— असा हा या टोपणनावाचा इतिहास आहे !

× × ×

याप्रमाणे Bee यांजविषयीं सहजगत्या सुचलेल्या चार आठवणी येथे दिल्या आहेत. Bee यांच्या स्वर्गीय सहवासांतील स्मृतींची जतन करून ठेवलेलीं हीं अत्यल्प फुलें— नव्हे, त्या फुलांच्या सुकल्या-मुकल्या चार-दोन पाकळ्या-ओंजळींत घेऊन अत्यंत आदरपूर्वक त्यांच्या यशोमंदिराच्या पायऱ्यांवर मी आणून ठेवीत आहें !

रामदास हनुमंत देशपांडे

२

रा० त्र्यं. ब. पुराणिक, बी. ए. हे अकोला जिल्ह्यांत एक शिक्षणाधिकारी (ए. डी. आय्.) आहेत. आपल्या प्रांतांतील शिक्षणखात्यामधील ज्या थोड्या अधिकाऱ्यांना वाङ्मयप्रेम आहे, त्यांपैकी पुराणिक हे एक होत.

१९३७ सालच्या उन्हाळ्याची गोष्ट. मी, माझे मित्र प्रा.अ. ना. देशपांडे व रा. व्यंकटेश वकील असे तिघेजण कविवर्य Bee यांच्या निवासस्थानीं पहिल्यांदाच वेळ ठरवून गेलों. ते त्यावेळीं त्यांचे जामात रा. प्रधान यांच्याकडे राहत असत. त्यांची पत्नी निवर्तल्यानंतर ते बहुधा त्यांच्याकडेच असतात असें कळलें.

त्यावेळीं Bee यांची साठी उलटून गेली होती. एरवीं शरीरयष्टि काटक दिसत असली, तरी वार्धक्याची सत्ता देहावर पसरली होती. दृष्टि त्यावेळीं अधु झालेली असावी किलकिल्या डोळ्यांनी पाहत ते सर्व वेळ बोलत होते. बोलतांना तर्जनी व अंगठा यांचें वर्तुळ करून ते आपलें म्हणणें प्रतिपादन करतांना आढळत. एका हाताने ओठाजवळ विडी धरून ती तशीच ठेवून दुसऱ्या हाताने ते एकेक विडी आम्हांस देऊं लागले. आम्हीं नाकारतांच त्यांनी विनोदाने शेरा मारला, "खरंच, शिक्षक आहांत तुम्ही, नव्हे का? शिक्षकांवर सहसा व्यसनांचा पगडा बसत नाही खरा !" त्यानंतर काव्य, तत्त्वज्ञान व आम्हांस कठीण वाटलेल्या कांही त्यांच्या कवितांतील कल्पना यांवर त्यांनी मोकळेपणाने चर्चा केली.—

●

कविवर्य Bee यांचें सेवावृत्तींतलें बहुतेक आयुष्य अकोला येथे गेलें. त्यांच्याबरोबर ज्यांनी बरींच वर्षे रेव्हिन्यू खात्यांत नोकरी केली व ज्यांनी त्यांचें खाजगी जीवन प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलें, असे ३।४ सेवानिवृत्त सद्गृहस्थ माझ्या परिचयाचे आहेत. पुढे ४२-४३ च्या पावसाळ्याच्या अखेरीस त्यांचा मुक्काम रामदास क्रीडामंडळाच्या मैदानासमोरील बंगल्याच्या 'उपगृहा' मध्ये ('आऊट हॉउस' मध्ये) होता. तेव्हा पुष्कळ सेवानिवृत्त स्नेही कवींच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खोलींत जमा होत. कधी 'दासबोधा' वर तर कधी 'ज्ञानेश्वरी' वर चर्चा चालत. कठीण कल्पना अगर तत्त्वज्ञानाचीं प्रमेयें कवि अगदी सुलभतेने पटवून देत असत. आमचे आप्त कै. नरहरपंत पतकी यांना सेवानिवृत्तीनंतरच पोथ्यापुराणांची गोडी लागली. एका स्पष्टीकरणांत कल्पनांचा मेळ साहजिकच लौकर बसत नसे. त्यांनी पुन्हा विचारतांच Bee नी किंचित् रागावून म्हणावें, "कसे हो तुम्ही, नरहरपंत, साध्या गोष्टी सुद्धा तुम्हाला पुनःपुन्हा सांगाव्या लागतात!"—त्यांच्या स्नेही मंडळींचा हा अड्डा तेथें जमल्यावर निरनिराळ्या ग्रंथांची चर्चा होई. त्या सभेत नियमितपणें हजर राहणाऱ्यांपैकी कै. बाजीराव चान्सरकर यांनी असें सांगितलें की, 'कवींचा जुन्या वाङ्मयाचा अभ्यास इतका सखोल आहे की, विचारलेल्या शंकांचें निरसन ते फारच सोप्या व साध्या शब्दांत करूं शकतात.'

परंतु कलावंत म्हणून त्यांच्या लिखाणांत कमालीचा संयम आढळत असला, तरी खाजगी जीवनांत ते एक सडेतोड टीकाकार व क्वचित् प्रसंगीं खरडपट्टी काढणारे गृहस्थ या सदरांत जमा होतात! त्या चर्चा-प्रसंगीं असे प्रसंग वारंवार येत असावे. अर्थात् इतरांना, त्यांच्या थोर व्यक्तिमत्वाला मान देऊन, त्यांच्या चिडलेल्या मनोवृत्तीकडेहि आदरानेच पहावेंसें वाटे! येथल्या अनेक वर्षांच्या सहवासानंतर देखाल त्यांच्या या गुणांचें कौतुक न करतां येणारे अनेक लोक या गावीं आहेत! त्यांची Bee विषयींची समजूत "एक तुसडा म्हातारा!"–या शब्दांत मीं स्वतःच ऐकली आहे!! याला कारण कवींचा किंचित् एकलकोंडा स्वभाव!

●

एका संध्याकाळीं ते माझ्या घरीं अचानक आले. बरोबर कै. चान्सरकर होते. ही संधी साधून बऱ्याच प्रश्नांचा ऊहापोह करण्याचें मीं योजिलें होतें. पण पहिल्या प्रथमच त्यांनी सांगून टाकलें, "हें पाहा, माझ्या कवितेबद्दल बोलण्यासारखें माझ्याजवळ कांही राहिलें नाही. दुसऱ्या कशाबद्दल बोलाल, तर हरकत नाही." म्हणून मीं त्यांना पुढील गोष्टींसंबंधीं पृच्छा केली:—

१ इंग्रजी कवींपैकीं त्यांचा आवडता कवि कोण आहे? २ मराठी कवींसंबंधीं त्यांचें मत काय? ३ Bee यांची कविता अनेकांस गूढ वा कठीण वाटते, याबद्दल त्यांचें मत काय आहे? ४ त्यांना काव्य-रचनेस फार वेळ लागतो काय?—या प्रश्नांचीं Bee यांनी जीं उत्तरें दिलीं, तीं क्रमवार थोडक्यांत देतों:—

१ आवडते इंग्रजी कवि म्हणून Bee यांनी कीट्स्, शेले, कोलरिज, ब्राउनिंग व बायरन यांचा उल्लेख केला.

'Two Peaks of Poetry या इंग्रजी उक्तीची समर्पक तुलना Bee यांनी आपल्या 'कविवंदन' कवितेंतील '**ह्या दोघा रसरंगा घेउनि अंतर्हित होशी**' या चरणामधील 'रस' आणि 'रंग' यांच्याशीं करून दाखविली. Bee यांचा अद्भुत कवितेवर बराच भर असावा, असें दिसलें. त्यांना यामुळेच बहुधा कोलरिजची विशेष आवड दिसली.

२ हल्लीच्या मराठी कवींपैकीं राजकवि 'यशवंत' यांचें काव्य त्यांना बरेंच आवडत असावें, असें दिसलें. 'गिरीशां'च्या काव्यांतील गोड शब्दरचना हा गुण त्यांनी मुद्दाम उल्लेखून सांगितला. त्यांनी 'काव्यविटपारूढ कोकिळ' अशी ज्यांची स्तुति केली आहे, त्या 'नागेश' कवींबद्दलहि त्यांनी आदराचे उद्गार काढले.

३ आपल्या कवितेच्या 'गूढते' बद्दल किंवा काठिन्याबद्दल ओरड करणाऱ्या आक्षेपकांवर Bee यांनी प्रखर टीका केली. त्यांच्या टीकेचा मथितार्थ असा: माझ्या कवितेंत तत्त्वज्ञान आहे, पण तें आपल्या वाचकांस गूढ वा कठीण कां वाटावें? भारतीयांना तर तत्त्वज्ञानाचें बाळकडूच मिळालें आहे. मग त्यांना माझें काव्य कां कळूं नये? नदीकाठच्या गावांतील मुलांना जसें पोहणें शिकवावें लागत नाही, तसें भारतीयांना तत्त्वज्ञान शिकवावें लागत नाही. त्यांना थोडा प्रयास केल्यास माझें काव्य कळणें मुळींच कठीण नाही.—याप्रमाणे Bee यांनी गूढता किंवा काठिन्य याबाबत खुलासा केला.

४ 'फुलांची ओंजळ' पुस्तकाच्या प्रस्तावनेंत रा. अत्रे यांनी Beeयांस काव्यनिर्मितीस फार वेळ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लागत असावा असें अनुमानात्मक विधान केलें आहे. त्यासंबंधीं पृच्छा केली असतां Bee म्हणाले, " कधी कधी माझ्या कविता फारच थोड्या वेळांत झाल्या आहेत. त्यांना दीर्घकाल लागला, असें म्हणतां येत नाही. " एकदा तर ते गमतीने " कल्पनेपुढे शब्द हात जोडून उभे राहतात—" असेंहि म्हणाले होते !

—व्यं. ब. पुराणिक

गुप्त सरस्वती

Bee

Bee यांचीं वा. ना. देशपांडे यांस पत्रें

१

Bee यांस मीं एक प्रश्नपत्रिका पाठविली होती. ती प्रश्नपत्रिका व तिला Bee यांनी दिलेलीं उत्तरें पुढे दिलीं आहेत. स्वतःविषयीं माहिती देण्यास Bee किती नाखुष असतात, हें त्यांच्या उत्तरांवरून दिसून येईल !— वा. ना. दे.

छिंदवाडा, ता. २६-१०-१९४५

प्रश्न १—वडिलांचें पूर्ण नाव काय ? ते कोण व कुठे होते ?

प्रश्न २—आपल्या घराण्यांत कुणास वाङ्मय-प्रेम होतें का ?

प्रश्न ३—आपली जन्मतारीख काय ?

प्रश्न ४—आपलें बालपण कुठे व कसें गेलें ?

प्रश्न ५—शिक्षण किती व कुठे झालें ?

प्रश्न ६—विवाह कधी झाला ? पत्नी कधी वारल्या ?

प्रश्न ७—मुलें व मुली किती आहेत ? त्यांचीं नावें ? तीं काय करतात ?

उत्तर—(वरील सात प्रश्नांस)—ही माहिती ' फुलांच्या ओंजळी ' च्या प्रकाशकाने 'दोन शब्दां' खालीं दिली आहे. ती पुरेशी आहे. दोन ज्ञानेश्वर, दोन रघुनाथपंडित, दोन वामनपंडित असा वाद माझ्यासंबंधीं होणार नाही !

एखाद्या अगदी सामान्य व्यक्तीचें उदात्तीकरण करणें हें आजपर्यंत हास्यास्पद झालें आहे !

प्रश्न ८—पहिली कविता लिहिण्यास स्फूर्ति कशी झाली ?

उत्तर—कवितेच्या नवीन प्रवाहाचें पात्र थोडेंसें अधिक खोल आणि थोडेंसें अधिक रुंद करितां आलें, तर पाहावें, म्हणून मी कविता लिहूं लागलों.

प्रश्न ९— लेखनांत आपण कोणास गुरु मानलें आहे काय ?

उत्तर—नाही.

प्रश्न १०—आवडते कवि कोण व ते का आवडतात ? (अ) इंग्रजी कवि (आ) संस्कृत कवि (इ) व प्राचीन मराठी कवि यांपैकी कोण आवडतात ?

उत्तर—(अ) इंग्रजी कवि-ब्राउनिंग-कल्पनेची भव्यता आणि विशालता (Grandeur) टेनिसन्—लालित्य.

(आ) संस्कृत कवि—भवभूति—ओज आणि भावनांचें असीम मार्दव. (इ) प्राचीन मराठी कवि—ज्ञानेश्वर—शब्दसृष्टीचा ईश्वर, तेजस्वी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कल्पना, सूक्ष्म निरीक्षण आणि त्याचा कुशलतेने केलेला उपयोग. मुक्तेश्वर—सृष्टिवर्णनें, माधवेचें अपूर्व लावण्य. तुकाराम—आपल्या अंतःकरणाचा प्रत्येक अणुरेणु प्रकाशमान करण्याचें सामर्थ्य वाणींत आहे. सहजता आहे. मार्वोत्कटता आहे.

प्रश्न ११—आधुनिक कवींपैकीं कोण कोण आवडतात ?

उत्तर—सर्वच आधुनिक कवि आवडतात. ते मीं वाचले आहेत, पण त्यांचा अभ्यास केला नाहीं.

प्रश्न १२—केशवसुत, टिळक, विनायक—यांबद्दल आपलें काय मत आहे ?

उत्तर—केशवसुत, टिळक, विनायक हे सर्वच उत्तम कवि आहेत.

प्रश्न १३—मराठी गद्यलेखक कोण आवडतात ?

उत्तर—रा. ब. देशमुख ('शतपत्रें' लिहिणारे), विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर, 'काळ' कर्ते परांजपे, हरि नारायण आपटे, वामन मल्हार जोशी ('रागिणी' कर्ते), राम गणेश गडकरी, साने गुरुजी, खांडेकर—आणखीहि श्रेष्ठ ग्रंथकर्ते आहेत. त्यांचीं नावें कोठपर्यंत लिहावीं ?

प्रश्न १४—आपला गेल्या पिढीपैकीं कोणकोणत्या थोर साहित्यिकांशीं पत्रव्यवहार वा ओळख होती ?

उत्तर—गोविंदाग्रज, रे. टिळक, मिसेस् लक्ष्मीबाई टिळक, नागेश, रेंदाळकर, बालकवि, ठोमरे–आणखी पुष्कळांचीं पत्रें आलीं होतीं. परंतु तीं औपचारिक होतीं.

प्रश्न १५— 'मनोरंजन' कडे कविता पाठविण्यास आपण कशी सुरवात केली ? आपणास कांहीं मोबदला मिळाला काय ?

उत्तर—'मनोरंजन' मासिक मला आवडलें, म्हणून मीं त्यांत लिहिलें. मोबदला कांही मिळाला नाहीं.

प्रश्न १६—आपण Bee हें नाव कसें घेतलें ?

उत्तर— मी पहिल्याने 'भुंगा' हें नाव देणार होतों. पूर्वी यवतमाळ येथे राहणारे शंकर विठ्ठल दीक्षित, सनाढ्य ब्राह्मण, यांनी Bee हें नाव सुचविलें. मलाहि तें आवडलें. हे दीक्षित अकोला येथे वारले.

प्रश्न १७—आपणास स्वतःच्या कोणत्या कविता विशेष चांगल्या वाटतात ? कां ?

उत्तर—ह्या प्रश्नाचें उत्तर मला देतां येत नाहीं. मला सर्वच कविता सामान्य वाटतात.

प्रश्न १८—भाषाप्रभुत्वासाठीं आपण काय केलें ?

उत्तर—भाषाप्रभुत्वाचा आरोप माझ्यावर कोणींहि चुकून देखील करूं नये ?

प्रश्न १९—आपलें 'जीवितविषयक तत्त्वज्ञान' काय आहे ? आपल्या कवितेंत निराशेचा शब्दहि नाहीं, ही मनःशांति कशी प्राप्त झाली ? आपण रोज कांहीं पूजा-अर्चा करतां काय ?

उत्तर—पुनर्जन्म, कर्मसिद्धान्त, अद्वैत सिद्धान्त, ईश्वर यांवर माझा विश्वास आहे. सर्व मानव ही एक जात आहे. हें अंतिम ध्येय आहे. हा मनुष्यत्वाचा पूर्ण विकास आहे. हा विकास पूर्ण होण्यास किती शतकें लागतील, तें सांगतां येत नाहीं. **हें अंतिम ध्येय आमच्या डोळ्यांसमोर नेहमीं असलें पाहिजे.** तेथपर्यंत मानवी मनाचा विकास होऊं शकतो, हें साधुसंतांच्या चरित्रावरून दिसून येतें.

आज मानवी मनाच्या विकासाची मर्यादा फक्त राष्ट्रापर्यंतच गेली आहे आपलें प्रत्यक्ष कार्यक्षेत्र हेंच पाहिजे. नाहीतर आम्ही आजच्या जगाच्या फार मागे पडूं.

माझ्या पुस्तकांत 'फुलांची ओंजळ' ही एक कविता आहे. तींत सृष्टिचक्राचें थोडेंसें वर्णन आहे. 'पूर्णापासुनि ढळलेलें जग जातें पूर्णाकडे'– इ. इ. ओळी आपणास वेळ असल्यास वाचून पाहण्यासारख्या आहेत.

मनःशांति फक्त ईश्वरभक्तालाच मिळते. सामान्य प्रापंचिक माणसाला ती कोठून मिळणार ? कवितेंत स्वतःचें रडगाणें काय कामाचें आणि त्याची दुसऱ्याला काय जरूर ? ध्यानयोगाचा आणि तत्त्वचिंतनाचा अभ्यास फार वर्षांपासूनच करीत आलों आहें.

प्रश्न २०—नवीन कवींस आपला काय संदेश आहे ?

उत्तर--संदेश देण्याचा माझा अधिकार नाहीं.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

२

[पुढील कवितेंत Bee यांनी आपल्या 'बकुल' कवितेचा भावार्थ स्पष्ट केला आहे.]

छिंदवाडा, ता. २०–१०–४५

'बकुल' कवितेचा भावार्थ

या कवितेवरून–आणि फक्त याच कवितेवरून या स्त्रीची स्वभावरेषा कशी रेखाटली गेली आहे, हें आपण पाहूं.

रूप आणि ऐश्वर्य यांच्या भराने ही गर्वांध झाली आहे. स्वभावांत अवखळपणा आणि नादिष्टपणा भरला आहे. दुसऱ्यावर अधिकार गाजविण्याची हौस आहे. सर्वांनी आपली स्तुति सदैव करावी, आज्ञा पाळावी, आपल्या मर्जी-प्रमाणे वागावें, अशी प्रबळ इच्छा आहे. थाटमाट, आपल्या वैभवाचें प्रदर्शन करणें तिला आवडतें. तिच्यांत बेपर्वाई आणि बेफिकीरपणा भरला आहे. हे सर्व तिचे अल्लडपणाचे दोष तिच्या मुग्धावस्थेंत फार खुलून दिसतात. अस्सल आर्य-संस्कारांत ती जन्मलेली आणि वाढलेली आहे, हें तिच्या उद्गारांवरूनच स्पष्ट दिसतें.

'बकुला' प्रमाणेच तिच्या परिचयाचे इतर तरुणहि तिच्या प्राप्तीकरिता सारखे झटत असत. 'बकुला' विषयीं तिच्या मनांत प्रेमाचें बीजारोपण केव्हा झालें, हें तिला कळलें नाहीं. तसेंच, आपल्या हातींचें 'बकुल' पुष्प केव्हा गळून पडलें, याचें तिला नादाच्या भरांत भानहि राहिलें नाहीं.

'प्रारंभींच निशा वनांत अपुला अंधार पाडीतसे'— या ओळींत 'प्रारंभींच' म्हणजे आपल्या तारुण्याच्या प्रथमावस्थेच्या प्रभातकालींच; 'वनांत' म्हणजे आपल्या आयुष्याच्या उत्साहपूर्ण प्रदेशांत; 'निशा' म्हणजे निराशा. हें असें कशामुळे झालें ?–हातींचें 'बकुल' प्रसून गळलें म्हणून. असा तिच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.

'नारीधर्मरहस्यभाग नव्हता ठाऊक मातें जसा'—ती म्हणते नारीच्या मूळ स्वभावाचा जो एक अत्यंत रहस्यमय भाग असतो, त्याची मला यापूर्वी, मी नारी असून देखील, मुळींच जाणीव झाली नव्हती. हा रहस्यमय भाग कोणता, याचें तिने आपल्या मुखानेच निदर्शन केलें आहे. तें असें—**'श्वासें देह करी सुवासित जरी संसर्ग याचा घडे। चित्तीं चित्त विरे अनावर मिठी प्राणास याची पडे ॥'** इ. इ. रहस्यमय, अत्यंत रमणीय, अत्यंत आनंदमय, अत्यंत सुखमय, अद्वितीय अवस्थेचें शब्दांनी वर्णन करणें अशक्य आहे. याच चरमदशेला, परमावधीच्या अवस्थेला 'भावसमाधी' म्हणतात !

मला वाटतें, आता सबंध कवितेचा भावार्थ देण्याची जरूर नाही. आपल्यासारख्या रसिकाला तो सहज कळून येईल.

माझी 'गिरिगान' ही कविता अशाच प्रकारची आहे. तींत नुसतें साधें सृष्टिवर्णन नाही.

३

[पुढील कवितेंत Bee यांनी 'क्षणभर' ही कविता कुणाला उद्देशून लिहिली आहे, हें स्पष्ट केलें आहे.]

छिंदवाडा, ता. २–१०–१९४५

जातां जातां आपणाला लिहावेंसें वाटतें कीं, आपण नागपुर येथील 'भवितव्या'च्या ता. २८ सप्टेंबर १९४५ च्या अंकांत आलेल्या वि. देशपांडे यांच्या 'काव्यांतील गुलाब' या लेखाचा पहिला प्यारा अवश्य वाचावा. आणि, नंतर माझी 'क्षणभर' ही कविता सवड झाल्यास वाचून पाहावी. या कवितेचा उतारा 'महाराष्ट्र सरस्वती' भाग दुसरा यांत संपादक श्री. वा. रानडे व गं. दे. खानोलकर यांनी घेतला आहे. त्यांत ते ही कविता ईश्वरभक्तिपर आहे, असें मानतात ! हें अगदी चूक आहे. मार्क्सचें इंग्रजी भाषेंतील चरित्र वाचीत असतांना त्यांत त्याचा अनन्वित छळ झाल्यामुळे त्याला जर्मनी आणि फ्रान्स सोडून आपल्या कुटुंबासह इंग्लंडांत जाऊन राहावें लागलें, असें वर्णन आलें आहे. तेथे अनेक हालअपेष्टा भोगीत असतांना एक गृहस्थ मार्क्सबाईच्या भेटीस आला. त्याने मार्क्सबाईला विचारलें, "इतका भयंकर छळ व हालअपेष्टा सोशीत असतांना आपण अगदी आनंदी कशा दिसतां ?" तिने उत्तर दिलें, "होय, आमच्या आणि आमच्या मुलाबाळांच्या हालअपेष्टांची जाणीव आम्हांला नेहमी बोचत असते ! परंतु ज्या एका ध्येयाकरिता माझे पति व आम्ही या हालअपेष्टा

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भोगीत आहों, तें ध्येय आमच्या डोळ्यांपुढे उभें राहिल्याबरोबर भोगीत असलेल्या हालअपेष्टा आम्ही पार विसरून जातों ! आणि आम्हांला त्याचें भान राहत नाही ! "

'क्षणभर' ही कविता लिहिली, त्या वेळेला आमच्याहि देशभक्तांना जो असह्य जुलूम सहन करावा लागला, त्याचें चित्र माझ्या डोळ्यांपुढे उभें राहिलें होतें. आणि, आपलें सर्वस्व अर्पण करीत असतांनाहि ते कसे आनंदित दिसत असत याचें कारण कळून आलें ! 'क्षणभर' ही कविता ईश्वर-भक्तिपर नसून, तिचा विषय 'आमचे हुतात्मे' हा आहे.

पुरवणी

छिंदवाडा, ता. १७-१०-१९४५

'क्षणभर' कवितेंत 'रट्ठ चर्म गाठांनी भरलें' ही ओळ फार महत्त्वाची आहे. भक्ति म्हणजे प्रेम. भक्ति ईश्वराविषयीं, देशाविषयीं, कांचनाविषयीं अथवा कांतेविषयीं असूं शकते. पण वरील ओळीवरून ती देशाविषयींच कां व्यावी याचा बोध होतो. कारण फटके खाणें, लाथा खाणें, चक्की पिसणें, मोट ओढणें, दोरखंड वळणें, खाली जमिनीवर आपटलें जाणें—इत्यादि प्रकारांमुळे चामडें राठ होतें, घट्टे पडतात, गाठी येतात. असें रट्ठ चर्म वगैरे होण्याचे प्रकार इतर भक्तींत घडून येत नाहीत.

५

[पुढील टिपणांत Bee यांनी 'लोकगीतें व यतिमात्रा' यांच्याविषयींचें आपलें मन व्यक्त केलें आहे.]

छिंदवाडा, ता. २३-१२-१९४५

'लोकगीतें आणि यतिमात्रा'

दिंडी, साक्या, पदें, भूपाळ्या, लावण्या-वगैरे मराठी कविता गाण्याकरिता रचल्या आहेत. हीं लोकगीतें होत. तीं रागात्मक असल्यामुळे त्यांचा संबंध **संगीत शास्त्राशीं** आहे.

मात्राः—वर्णाच्या उच्चारास जो काळ लागतो, त्याची गणना मात्रांच्या द्वारें केली जाते.

वर्णः—स्वर आणि स्वरयुक्त व्यंजन. व्यंजनाला स्वतंत्र उच्चार नसतो. म्हणून त्याची मात्रा मानीत नाहीत.

उच्चार-भेदाने वर्णांचे दोन प्रकार होतात. ऱ्हस्व अथवा दीर्घ, किंवा लघु आणि गुरु ऱ्हस्वाची एक मात्रा. दीर्घाच्या दोन.

जोडाक्षराच्या अगोदर ऱ्हस्व वर्णाच्या उच्चाराला अपेक्षेपेक्षा जास्त काल लागत नसेल, तर तो पहिला ऱ्हस्व वर्ण ऱ्हस्वच राहतो. तसेंच, दीर्घाक्षराचा अर्धवट उच्चार केला असतां, त्याला **ऱ्हस्वच मानिलें जातें** व ऱ्हस्व अक्षराचा दीर्घ उच्चार केल्यास त्याला **दीर्घ मानतात.**

लक्ष्यांत ठेविलें पाहिजे की, गणना **उच्चार-कालाची** होते, अक्षराच्या रूपांची नाही.

प्राचीनकालापासून तों आजपर्यंत जीं लोकगीतें आहेत, त्यांत ज्याला साधारणतः मात्रा म्हणतात, त्यांचा नियम नसतो. कारण ज्या चालीवर तीं गीतें म्हटलीं जातात, त्या चालीप्रमाणे ऱ्हस्व अक्षर दीर्घ होईल, किंवा दीर्घ अक्षर ऱ्हस्व होईल [संगीत-शास्त्राच्या नियमाप्रमाणे]. चालीच्या ओघांत कांही अडथळा येत नाही. मात्रांची मर्यादा दोन ते चार-पर्यंत कमीजास्त झाल्यास, तें अशुद्ध होणार नाही. चारपेक्षा जास्त मात्रा चालीच्या ओघांत मावत नाहीत. त्या बाहेर फेकल्या जाऊन तें गीत बेताल व बेसूर होतें. संगीताप्रमाणे मराठी लोकगीतांत यति नसतात.

नारायण मुरलीधर गुप्ते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

[लेखनाची तारीख १० मे १९४६]

'युगवाणी' चा प्रस्तुत अंक 'Bee विशेषांक' म्हणून प्रसिद्ध होत आहे. कविवर्य Bee हे आधुनिक सर्वश्रेष्ठ कवींपैकी एक आहेत. पंचाहत्तरीच्या घरांतील हे कविवर्य अजून आपणांमध्ये विद्यमान आहेत, हें खरोखरी आपणा सर्वांचें सुदैव होय. अशा या वयोवृद्ध कविवर्याबद्दल वाटणारा गाढ आदर व्यक्त करण्याचें एक साधन म्हणून हा विशेषांक काढण्यांत येत आहे.

या अंकांत Bee यांच्या सहा अप्रसिद्ध कविता प्रसिद्ध होत आहेत. या कविता म्हणजे Bee च्या चाहत्यांस बहुमोल ठेवाच वाटेल, याविषयीं मला शंका नाही. अत्यानंदाची गोष्ट ही आहे की, Bee यांच्या आणखीहि कविता 'युगवाणी' तून वेळो-वेळीं प्रसिद्ध होणार आहेत. त्या वाचण्यासाठीं तरी वाचकांनी 'युगवाणी' चे वर्गणीदार व्हावयास पाहिजे, असें मीं म्हटल्यास, निदान सहृदय वाचक तरी मजवर 'जाहिरातबाजी' चा आरोप खचित करणार नाहींत ! या अंकांत Bee संबंधीं कांहीं लेखहि आलेले आहेत. स्वतः मीं लिहिलेल्या परिचय-लेखांतील माहिती मिळविण्यास मला कोण प्रयास पडले ! खुद्द Bee 'मौनं चैवास्मि गुह्यानाम्।' असें म्हणून मूग गिळून बसलेले आहेत. बरें, त्यांच्या आप्तेष्टांकडे धाव घ्यावी, तर तिकडूनहि निराशा पदरीं येते ! अशा स्थितींत नमूद केलेली माहिती प्रयासानेच मिळाली असली पाहिजे, हें निराळें सांगावयास नको. विशेषांकांत Bee चीं पत्रें व छायाचित्रहि देण्यांत आलें आहे. तात्पर्य, हा विशेषांक शक्य तितका सर्वांगसुंदर करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या विशेषांकाचें रसिकांकडून योग्य स्वागत होईल, अशी आशा आहे.

रा. ग. त्र्यं. माडखोलकर

बेळगाव येथे १२ मे पासून महाराष्ट्र-साहित्य-संमेलनाचें तिसावें अधिवेशन भरणार आहे. या संमेलनाचें [किंवा ललित विभागाचें म्हणा, हवें तर !] अध्यक्षस्थान रा. ग. त्र्यं. माडखोलकर यांस देण्यांत आलें आहे. याबद्दल मी त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. माडखोलकर हे टीकाकार, कादंबरीकार व वृत्तपत्रकार या नात्यांनी महाराष्ट्रभर सुविख्यात आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांविषयीं कुणाचा कदाचित् मतभेद असला, तथापि त्यांचें टीकावाङ्मय श्रेष्ठ प्रतीचें आहे, याबाबत मतभेद होण्याचें कारण नाही. 'तरुण भारत' हें दैनिक त्यांनीं यशस्वितेने चालवून दाखविलें आहे, ही त्यांची कामगिरी दृष्टीआड करण्यासारखी नाहीं. तसेंच, मराठी भाषेंतील एक थोर 'शैलीकार' (Stylist) आहेत, हेंहि नाकारतां येत नाही. — असा हा श्रेष्ठ साहित्यिक संमेलनाध्यक्ष व्हावा, ही गोष्ट उचित अशीच झाली. नागपूर प्रांतांतून साहित्य-संमेलनाचा अध्यक्ष प्रथमच निवडण्यांत येत आहे, ही घटनाहि उल्लेखनीय आहे.

संयुक्त महाराष्ट्राचा ठराव

बेळगावच्या अधिवेशांत संयुक्त महाराष्ट्राचा ठराव मांडण्यांत येणार आहे, त्यास सर्व महाराष्ट्रीयांनी पाठिंबा द्यावयास पाहिजे. मराठी भाषा बोलणारा मुलुख अतिशय खंडित झाला आहे. गोमंतक पोर्तुगीज सत्तेखाली, तर मराठवाडा निजामच्या राज्यांत गेला. वऱ्हाड व मराठी मध्यप्रांत पश्चिम महाराष्ट्रापासून कधींचे तोडले गेले आहेत आणि त्यांची दावण महाकोसलशीं बांधण्यांत आली आहे ! मराठी भाषा बोलणारा हा सर्व मुलुख एकत्रित होऊन, 'संयुक्त महाराष्ट्र' या नांवाने ओळखला जावयास पाहिजे. गोमंतक व मराठवाडा यांचा प्रश्न बिकट म्हणून तूर्त बाजूस सारला, तरी उरलेल्या महाराष्ट्राचें एकीकरण व्हावयास पाहिजे, हें उघड आहे.

काँग्रेसने भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व मान्य केलेलेंच आहे. त्या तत्त्वानुसार स्वतंत्र हिंदुस्थानात

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

महाराष्ट्राचें एकीकरण झाल्यावाचून निःसंशय राहणार नाही. परंतु त्यापूर्वी स्वतः महाराष्ट्रीयांनी जोराची चळवळ करावयास पाहिजे. या दृष्टीने हा ठराव स्वागतार्हच आहे, यांत शंका नाही.

महाराष्ट्राच्या एकीकरणाच्या प्रश्नास 'युगवाणी'चा सदैव पाठिंबा राहील, एवढें नमूद केलें, म्हणजे पुरें.

क्षमस्व !

'युगवाणी'चे मागे पडलेले अंक लौकर प्रसिद्ध करण्याची आटोकाट खटपट करण्यांत येत आहे. 'युगवाणी'ला प्रतिकूल परिस्थितींतून मार्ग काढावा लागत असल्यामुळे, केलेल्या सर्वच योजना हव्या तेव्हा पार पडूं शकत नाहींत. तथापि प्रयत्नांची शिकस्त करण्यांत येत आहे, एवढें वाचकांच्या निदर्शनास मी आणूं इच्छितों. लौकरच मनासारखी घडी बसेल, अशी उमेद आहे. तोंवर वाचकांनी होणाऱ्या विलंबाकडे सहृदयतेने पाहावें, अशी नम्र प्रार्थना आहे.

अंक थोडे माघारले असले, तरी पण वाचकांपुढे उत्तमोत्तम साहित्य ठेवण्याची मी कोशीस करीत आहे, हें येथे नमूद करण्याची परवानगी घेतों.

वाचकांनी 'युगवाणी' बद्दलचा आपापला अभिप्राय निर्भीडपणें वेळोवेळीं मला कळवावा, अशी त्यांस विनंती आहे. त्यांच्या सूचनांचा काळजीपूर्वक विचार करून मासिकाच्या स्वरूपांत शक्य त्या सुधारणा मी अवश्य करीन.

[पान ३० वरून समाप्त]

विदर्भ साहित्य संघ

आगरकरांचें जीवनकार्य या विषयावरील ग्रंथास पारितोषिक

धुळ्याचे श्री. रिषभदास रुंका यांनी आपला दिवंगत पुत्र रोहिताश्व याच्या स्मृतीसाठी, "**आगरकरांचें जीवनकार्य**" या विषयावर मराठींत एक उत्कृष्ट ग्रंथ निर्माण व्हावा याकरितां विदर्भ साहित्य संघातर्फे रु. ५०० चें पारितोषिक देण्याचा हेतु व्यक्त केला आहे. ग्रंथाचें स्वरूप सर्व-सामान्य जनतेला रुचेल, बोधप्रद व स्फूर्तिदायक होईल, असें असावें व ग्रंथ अंदाजें क्राऊन षोडशपत्री आकाराचीं २५० पृष्ठें होतील एवढा व्हावा. या विषयावर वर दर्शविल्याप्रमाणे ग्रंथ लिहिण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनी ग्रंथाचा तपशीलवार आराखडा व सुमारें २५ पृष्ठांचें एखादें प्रकरण लिहून तें आजपासून तीन महिन्यांच्या आंत खालीं सही करणाराकडे पाठवावें अशी विनंती आहे. लेखक अमुकच प्रांतांतील असावा अशी अट नाही. कोठ-ल्याहि लेखकाने ग्रंथ लिहिण्याचें मनावर घेतल्यास चालेल. ग्रंथाच्या बाबतींत सर्व प्रकारचा निर्णय करण्यासाठी वि. सा. संघाने खालील समिति नेमली आहे.—

१ **आचार्य काकासाहेब कालेलकर**
२ **आचार्य दादा धर्माधिकारी**
३ **डॉ. य. खु. देशपांडे**
४ **प्रा. श्री. ना. बनहट्टी**
५ **डॉ. मा. गो. देशमुख**
६ **प्रा. वा. कृ. चोरघडे** [आमंत्रक]

याबाबतचा सर्व पत्रव्यवहार खालील पत्यावर करावा.

(प्रा.) वा. कृ. चोरघडे
वर्धा [सी. पी.]

हें मासिक श्री० **तु. मा. पाटील** यांनी श्री० ह. व्या. प्र. मंडळाच्या सरस्वती मुद्रणालयांत छापलें व श्री० **ना. कृ. दिवाणजी**, एम्. ए., सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ यांनी अमरावती येथे संघाच्या कार्यालयांत प्रसिद्ध केलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष

प्रा. श्री. ना. बनहट्टी यांचे ग्रंथ

ज्ञानोपासना आणि भारतीयांचें कर्तव्य (दुसरी आवृत्ति) किं. २ रु.
सध्याच्या राष्ट्रीय जागृतीच्या काळीं या ग्रंथाचें वाचन प्रत्येकाने करणें अवश्य आहे.

मयूरकाव्यविवेचन किं. २॥. रु.
कविवर्य मोरोपंतांवरील प्रमाणभूत ग्रंथ

एकावळी किं. १॥ रु.
विख्यात साहित्यिकांचीं सुंदर व्यक्तिचित्रें

विष्णुपदी किं. ४ रु.
विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे संकलित लेख–सुमारें ३०० पानें दुर्मिळ व अप्रसिद्ध मजकूर.

....

'युगवाणी' मासिकाचे संपादक
श्री. वामन नारायण देशपांडे यांचा काव्यसंग्रह

आराधना—
महाविदर्भांत सर्वोत्कृष्ट ठरून नागपूर विद्यापीठातर्फे के. ना. बेंद्रे पारितोषिक, मिळविणारा सर्वोत्कृष्ट काव्य–ग्रंथ.

फक्त १० रु. मनीआर्डरीने पाठविणारांस वरील ग्रंथ रजिस्टर्ड पोस्टाने घरपोच पाठविण्यांत येतील.

सुविचार प्रकाशन मंडळ, लि०
काँग्रेसनगर, नागपूर.

वऱ्हाड-मध्यप्रांतांतील सर्वांत जुनें आणि एकमेव मराठी शैक्षणिक मासिक
वर्ष ७२ वें **वऱ्हाडशाळापत्रक** [वा. व. फक्त रु. २॥.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ